मा. व्यवस्थापन परिषद सभा
०१/२०२१–२२ सोमवार दिनांक ०२.०८.२०२१

# कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

## इतिवृत्त

## व्यवस्थापन परिषदेची नियमित सभा

## ०१/२०२१–२२

## सोमवार, दिनांक ०२ ऑगस्ट, २०२१

**Google App द्वारा Online सभा**

Scanned with Oken Scanner

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
मा.व्यवस्थापन परिषद सभा
क्र. ०१/२०२१–२२ सोमवार दिनांक ०२.०८.२०२१
**इतिवृत्त**

दिनांक ०२.०८.२०२१ रोजी १२.०० वाजता विश्वविद्यालयाच्या व्यवस्थापन परिषदेची सभा आभासी माध्यमाने संपन्न झाली. सभेत खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. श्रीनिवास वरखेडी, मा.कुलगुरू | अध्यक्ष |
| २) | प्रा. नंदा पुरी | सदस्य |
| ३) | प्रा.डॉ.अम्बा कुळकर्णी | सदस्य |
| ४) | श्री. गिरीशचंद्र ब. व्यास | सदस्य |
| ५) | डॉ.हरेकृष्ण अगस्ती | सदस्य |
| ६) | डॉ.भाऊ दांदळे | सदस्य |
| ७) | डॉ. कविता होले | सदस्य |
| ८) | प्रा. कृष्णकुमार पाण्डेय | सदस्य |
| ९) | डॉ. मधुसूदन पेन्ना | सदस्य |
| १०) | प्रा. डॉ. प्रसाद गोखले | सदस्य |
| ११) | डॉ. रामचंद्र जोशी | स्थायी निमंत्रित सदस्य |
| १२) | डॉ. उमेश शिवहरे | स्थायी निमंत्रित सदस्य |
| १३) | प्रा. डॉ. कविता होले | सचिव (प्र) |

मा. कुलगुरू महोदय आणि रामटेक येथे प्रत्यक्षपणे उपस्थित सर्व माननीय व्यवस्थापन सदस्य यांनी विश्वविद्यालयातील कारोना प्रादुर्भाव होउन दिवंगत झालेले कर्मचारी स्व.रितेश मेश्राम व स्व.अरविंद राठोड यांच्या कुटंबीयांना विश्वविद्यालयातील कर्मचारी वर्ग आणि विश्वविद्यालय यांनी संयुक्तपणे जमा केलेली राशी रू.५,००,०००/– प्रत्येकी याचे वितरण करण्यात आले. या उपरान्त बैठकीला सुरवात झाली.

मा. अजित बाविस्कर, उपसचिव, मुंबई यांनी सभेला उपस्थित राहु शकत नाही, असे कळविण्यात आले होते.

Scanned with Oken Scanner

**क्र. ०१** **व्यवस्थापन परिषद सभा ०७/२०२०—२१ मंगळवार, दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी संपन्न झालेले इतिवृत्त मान्य करण्याबाबत.**

**निर्णयः—** मा. व्यवस्थापन परिषद सभा ७/२०२०.२१ मंगळवार दिनांक ३०.०३.२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

**क्र. ०२** **व्यवस्थापन परिषद सभा ०७/२०२०—२१ मंगळवार, दिनांक ३० मार्च, २०२१ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तावर कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्याबाबत.**

**निर्णयः—** व्यवस्थापन परिषद सभा ०७/२०२०—२१ मंगळवार दिनांक ३०.०३.२०२१ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तावर कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीची सभेने नोंद घेतली.

**क्र. ०३** **व्यवस्थापन परिषद सभा (Agenda by Circulation) ०८/२०२०—२१ गुरुवार, दिनांक ०८ एप्रिल, २०२१ रोजी संपन्न झालेले इतिवृत्त मान्य करण्याबाबत.**

**निर्णयः—** मा. व्यवस्थापन परिषद सभा ८/२०२०.२१ गुरुवार दिनांक ०८.०४.२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

**क्र. ०४** **व्यवस्थापन परिषद सभा (Agenda by Circulation) ०८/२०२०—२१ गुरुवार, दिनांक ०८ एप्रिल, २०२१ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तावर कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्याबाबत.**

**निर्णयः—** व्यवस्थापन परिषद सभा ०८/२०२०—२१ गुरूवार दिनांक ०८.०४.२०२१ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तावर कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीची सभेने नोंद घेतली.

**क्र. ०५** **व्यवस्थापन परिषद आकस्मिक सभा ०९/२०२०—२१ शनिवार, दिनांक १५ मे २०२१ व रोजी संपन्न झालेले इतिवृत्त मान्य करण्याबाबत.**

**निर्णयः—** मा. व्यवस्थापन परिषद सभा ०९/२०२०.२१ शनिवार दिनांक १५.०५.२०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले.

**क्र. ०६** **व्यवस्थापन परिषद आकस्मिक सभा ०९/२०२०—२१ शनिवार, दि. १५ मे २०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेच्याइतिवृत्तावर कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्याबाबत.**

**निर्णयः—** व्यवस्थापन परिषद सभा ९/२०२०—२१ शनिवार दिनांक १५. ०५.२०२१ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तावर कार्यालयाकडून केलेल्या कार्यवाहीची नोंद सभेने घेतली.

<u>ग्रंथालय विभागः</u>—०७

बाब क्र. ७.०१ **वर्ष २०२०—२०२१ मधील विश्वविद्यालय साधारण निधीमधून ग्रंथ खरेदीबाबत.**
सामान्य निधी खात्यातून झालेला एकूण खर्च २०२०—२१

| निधी | ग्रंथ संख्या | ग्रंथाचा खर्च | नियतकालिकाची संख्या | नियतकालिकाचा खर्च | सुगम्य पुस्तकालय | सुगम्य पुस्तकालय खर्च | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|
| General | 473 | 2,11,769/- | 12 | 10610/- | 3years | 11600/- | 2,33,979/- |

Scanned with Oken Scanner

निर्णय: सदर बाब दि.२२.०७. २०२१ रोजीच्या ग्रंथालय समिती सभेत बाब क्र ५ अन्वये सादर करण्यात आली. सभेने यास मान्यता दिली व अंतिम मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यास सुचविले. करीता सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या कृतोत्तर मान्यतेस्तव सादर.

**निर्णय:—** **यास सभेने मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. ७.०२ Remote Access Services खर्च मान्यता व नूतनीकरणाबाबत.**

मुख्य ग्रंथालयाच्या आधुनिकीकरणाकरिता विभागामार्फत जानेवारी २०२१ मध्ये Remote Log Informatics Banglore Remote Access Service चे सभासदत्व एक वर्षाकरिता घेण्यात आले आहे.

| अ. क्र. | नाव | किंमती |
|---|---|---|
| १ | Remote Log Informatics Remote Access Service(one year) | 99946/- |
| | एकूण खर्च = | 99946/- |

यावर झालेला खर्च रू.९९,९४६/— कृतोतर मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे तसेच पुढील वर्षात जाने.२०२२ ला सदर सेवेचे Advance features सहित नूतनीकरण करण्याकरिता अंदाजित रू. १,५०,०००/— च्या तरतुदीस व खर्चास मान्यता देण्यास्तव सदर बाब सभेत सादर करण्यात येत आहे.

निर्णय: सदर बाब दि. २२.०७. २०२१ रोजीच्या ग्रंथालय समिती सभेत बाब क्र ६ अन्वये सादर करण्यात आली. सभेने Remote Access करिता रू.९९,९४६/—खर्चास कृतोत्तर मान्यता दिली व पुढील वर्षात जाने.२०२२ ला सदर सेवेचे Advance features सहित नुतनीकरण करण्याकरिता अंदाजित रू. १,५०,०००/— ची तरतुदीस व खर्चास मान्यता देण्याकरिता अंतिम मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यास सुचविलेकरीता सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या अंतिम मान्यतेस्तव सादर.

**निर्णय:—** **यास सभेने मान्यता प्रदान केली. प्रति वर्ष पाच लाख रूपयांची पुस्तक/नियतकालिके खरेदी नॅक च्या दृष्टीने करावी लागते तरी यासाठी पाच लाखाचे प्रावधान ठेवावे व यातूनच नियतकालिके आणि पुस्तके याचे ऑनलाईन सबस्क्रीप्शन्स करावे.**

**बाब क्र. ७.०३ Library Membership नियमात बदल करण्याबाबत.**

N' category (Institutional Membership) ग्रंथालय सदस्यता Deposit रू.५०००/— व शुल्क रू. १०००/— होते यामध्ये अधिष्ठाता मंडळ सभा (BOD) च्या निर्णयानुसार महाविद्यालयीन विभागामार्फत पत्र.क्र. १७६ दि.१५.०६.२०२१ ला Remote Access Library Membership (KRC)वार्षिकशुल्क रू. १०००/— सर्व महाविद्यालयांनी वर्गणीकृत करणे अनिवार्य असल्याचे कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार Deposit रू. ५०००/— रद्द करुन व त्याकरिता ग्रंथालय सदस्यता शुल्क रू. १०००/— आकारुन त्यांना केवळ Remote Access Service देण्यात येत आहे. सदर बाब सभेमध्ये कृतोत्तर मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती.

**निर्णय:** सदर बाब दि. २२.०७. २०२१ रोजीच्या ग्रंथालय समिती सभेत बाब क्र ७ अन्वये सादर करण्यात आली होती सभेने यास मान्यता दिली व अंतिम मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यास सुचविले. करीता सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या कृतोत्तर मान्यतेस्तव सादर.

**निर्णय:—** **यास सभेने मान्यता प्रदान केली. ही बाब केवळ** Remote Access Library Membership साठी लागू राहील.

Scanned with Oken Scanner

**बाब क्र. ७.०४ रत्नागिरी उपकेंद्रामध्ये विभागीय ग्रंथालय स्थापन करण्याबाबत.**

रत्नागिरी उपकेंद्रामध्ये भविष्यात विभागीय ग्रंथालय स्थापन करणे गरजेचे आहे. त्याकरिता ग्रंथालयामध्ये एक ग्रंथालय सहायक व ग्रंथालय परिचरांची नियुक्ती होणे आवश्यक आहे. तसेच ग्रंथ, फर्निचर व संगणकाची गरज असून त्याकरिता अंदाजित येणारा खर्च रू.५,९२,०००/– मान्यता मिळण्यास्तव सदर बाब ग्रंथालय सभेत प्रस्तुत करण्यात आली होती.

| No | | Items | Quantity | Budget |
|---|---|---|---|---|
| 1 | ग्रंथ खरेदी | Subject wise | | 2,00,000/- |
| 2 | फर्निचर | Shelving Racks | 04 | 40,000/- |
| | | Display Racks (Newspaper) | 02 | 10,000/- |
| | | Stool | 02 | 13,000/- |
| | | Reading Table | 10 | 1,00,000/- |
| | | Chair(for Staff and Students) | 30 | 40,000/- |
| | | Staff Table | 02 | 16,000/- |
| | | Journal Display Rack | 02 | 10,000/- |
| | | Trolley | 02 | 10,000/- |
| 3 | संगणकीकरण | Computer | 02 | 1,00,000/- |
| | | Printer | 01 | 15,000/- |
| | | Barcode Scanner | 01 | 2,000/- |
| | | Scanner | 01 | 36,000/- |
| | | एकूण खर्च | | 5,92,000/- |

निर्णय: सदर बाब दि. २२.०७.२०२१ रोजीच्या ग्रंथालय समिती सभेत बाब क्र. ८ अन्वये सादर करण्यात आली. सभेने यास तत्वत: मान्यता दिली व अंतिम मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यास सुचविले. करिता सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या अंतिम मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

निर्णय:– **रत्नागिरी येथील स्थानिक लोकांना विश्वविद्यालयाच्या विभागीय ग्रंथालयाला पुस्तके देण्याविषयी आवाहन करावे. तसेच रत्नागिरी येथे असलेल्या स्थानिक विधायक यांच्याकडे (Skill Education Fund) निधी संबंधी चौकशी करावी. रत्नागिरी येथील स्थानिक वाचनालयाशी संपर्क साधून ग्रंथालय विकसित करण्यास त्यांची मदत घ्यावी अशा सूचना सभेने दिल्या व यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. ७.०५ ग्रंथालयामध्ये १० संगणक व १ TV खरेदी बाबत.**

ग्रंथालयामध्ये ग्रंथालय सभासदांकरिता OPAC, Resources Access व ग्रंथालयातील कामाकरिता संगणकाची गरज आहे. सदर बाब खरेदी करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

| No | Items | Description | Quantity | Expenditure |
|---|---|---|---|---|
| 1 | संगणक | OPAC | 02 | 5,00,000/- |
| | | e-Resources | 02 | |
| | | Circulation | 02 | |
| | | Acquisition | 01 | |
| | | Database | 02 | |
| | | User Management System | 01 | |
| 2 | TV (72 Inch.) | Digital Display Board in KRC Building | 01 | 1,00,000/- |
| | Total | | | 6,00,000/- |

Scanned with Oken Scanner

उपरोक्त तक्ताप्रमाणे सदर बाब दि. २२.०७. २०२१ रोजीच्या ग्रंथालय समिती सभेत बाब क्र ९ अन्वये सादर करण्यात आली. सभेने यावर चर्चा केली व ग्रंथालयात उपलब्ध असलेले जुने संगणक दुरूस्ती करून वापरण्यात यावे. तसेच सभेने ५ नवीन संगणक व १ TV NAAC च्या दृष्टिकोनातून Digital Board Facility करिता खरेदी करण्यास तत्वत: मान्यता दिली व अंतिम मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करण्यात आले आहे.

निर्णय:— **मा. गिरीशजी व्यास, विधायक, यांच्याकडे (Skill Education Fund) अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती अर्ज पाठवावा. असे सभेने सूचविले व सभेने यास मान्यता प्रदान केली.**

<u>वित्त व लेखा विभाग:— ८</u>

बाब क्र. ८.०१ **कोविड—१९ अंतर्गत इन्शुरन्स पॉलिसीची रक्कम विश्वविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्याबाबत..**

सादर करण्यात येते की, प्रस्तुत विश्वविद्यालयातील नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कोविड—१९ अंतर्गत विमा पॉलिसी दि. १६.०४.२०२१ पासून ते २८९ दिवसांसाठी काढण्यात आलेली आहे. विश्वविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांची विमा पॉलिसीचे प्रिमियम विश्वविद्यालयाने एकमुस्त स्वरूपात रू.२,८३,६९३/— दि न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे जमा केलेली आहे. ही रक्कम समूह विमा पॉलिसी काढण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वेतनातून समान दोन हप्त्यात कपात करावयाची आहे. सबब कर्मचाऱ्यांच्या माहे जुलै—२०२१ आणि माहे ऑगस्ट —२१ च्या वेतनातून कपात करण्याच्या मान्यतेस्तव ही बाब सभेच्या निर्णयार्थ ठेवण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. ८.०२ **विश्वविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनातून शासन स्तरावर कपात होत असलेल्या DCPS/GPF खात्यांची सन २०१३—१४ ते २०१९—२० पर्यंतची सविस्तर माहिती अद्ययावत केल्याबाबत.**

विश्वविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नवीन पारिभाषित निवृत्ती वेतन अंशदान योजनेंतर्गत होत असलेल्या कपातीचा सन २०१३—१४ ते सन २०१९—२० पर्यंतच्या नोंदी शेड्युल्डनुसार तपासणी करुन, विश्वविद्यालयाचे नवीन पारिभाषित निवृत्ती वेतन अंशदान योजनेच्या रजिस्टर वर नोंदी घेऊन, स्लिप तपासणी करुन घेण्यात आल्या असून तपशील अद्ययावत करण्यात आला. तपासणीअंती मा.सहसंचालक कार्यालय, नागपूर यांचेकडून सन २०१३—१४ ते २०१९—२० पर्यंतच्या प्रमाणित स्लिप प्राप्त झाल्या असून विश्वविद्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना त्या वितरित करण्यात आल्या आहेत.

सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र.८.०३ **राज्यातील कोरोना आपत्ती निवारणाच्या उपययोजनांकरिता राज्यातील सर्व भा.प्र.से., भा.पो.से, भा.व.से व महाराष्ट्र राज्य शासकीय/निमशासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतनातील एक/दोन दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन दिल्याबाबत.**

प्रस्तुत विश्वविद्यालयातील नियमित/कंत्राटी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या माहे जून—२१ च्या वेतनातून शासन परिपत्रकानुसार (गट—अ व गट—ब) दोन दिवसांचे तसेच गट—क व गट —ड चे कर्मचारी यांच्या वेतनातून एक दिवसाचे वेतन कपात करण्यात आले आहे. कोरोना आपत्तीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यातील बहुतांश जिल्हात मोठ्या प्रमाणावर कोरोना विषाणूचा

प्रादुर्भाव झाल्यामुळे गंभीर परिस्थिती उद्‌भलेली असून, या आपत्तीस सामोरे जाण्यासाठी पुनर्वसनाच्या कामास सहाय्य व मदत ''मुख्यमंत्री सहायता निधी –कोविड – १९'' मध्ये प्रस्तुत विश्वविद्यालयाचा हातभार म्हणून एकूण रक्कम रू.३,६०,७६३/– स्टेट बॅक ऑफ इंडिया, मुंबई मुख्य शाखा, फोर्ट, मुंबई येथील बचतखाते क्र. ३९२३९५११७२० मध्ये ऑनलाईन पद्धतीने जमा करण्यात आले असून त्याचा कोड UTRNo.BKIDH/21201384731 असा असून विश्वविद्यालयाच्या पत्र क्र. ककासंवि/२०२०–२१ /वित्त/१९०दि.२०.०७.२०२१अन्वये सदर रक्कम प्राप्त झाल्याची पावती finance@kksu.org या ई–मेलआयडीवर पाठविण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे.

सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णयः– **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र.८.०४ **विश्वविद्यालयातील दिवंगत झालेले कर्मचारी श्री. रितेश मेश्राम, आणि श्री.अरविंद राठोड यांच्या कुटुंबीयांना सानुग्रह राशी उपदान स्वरूपात देण्याबाबत.**

सादर करण्यात येते की, विश्वविद्यालयातील कोरोना – १९ च्या प्रादुर्भावाने दोन कर्मचारी श्री.रितेश मेश्राम आणि श्री.अरविंद राठोड यांचे दु:खद् निधन झाले आहे. या दु:खाच्या कठिण परिस्थितीत दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटूंबांना विश्वविद्यालयाद्वारे सहकार्य आणि आर्थिक मदत देण्याचा निर्णय दि.१५.०५.२०२१ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेत बाब क्र.०३ अन्वये घेण्यात आलेला आहे. व्य.प. च्या निर्णयानुसार विश्वविद्यालयातील नियमित शिक्षक व शिक्षकेतर आणि सावधिक शिक्षक कर्मचारी यांच्या माहे मे–२०२१ च्या वेतनातून प्रती कर्मचारी एक दिवसाची वेतन कपात मा. कुलगुरूंच्या मान्यतेने करण्यात आली आहे. त्यानुसार नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतनातून रू.४,१४,०३२/– आणि सावधिक शिक्षक कर्मचारी यांचे वेतनातून रु.५९,२७४/– अशी एकूण रु.४,६३,३०६/– इतकी कपात करण्यात आलेली आहे. कर्मचाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या रक्कमेत काही रक्कम साधारण निधीतून समाविष्ट करुन प्रत्येकी रू.५,००,०००/– चे आर्थिक सहाय्य दोन्ही कर्मचाऱ्यांच्या कुटूंबाला साधारण निधीतून देण्यात येईल असा निर्णय पारित झालेला आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपात करण्यात आलेल्या रक्कमेशिवाय कमी पडत असलेली रक्कम रू.५,३६,६९४/– विश्वविद्यालयाच्या साधारण निधी खाते क्र.३१५७ मधून मा.कुलगुरूंच्या मान्यतेने दोन्ही कुटूंबाला प्रत्येकी रू. ५,००,०००/– आर्थिक सहाय्य देय करण्यात आलेले आहे.

सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णयः– **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र.८.०५ **एम्.के.सी.एल या संस्थेकडून चुकीने विश्वविद्यालयास प्राप्त झालेल्या रक्कमेचा परतावा केल्याबाबत.**

श्री. अतुल वडेगांवकर, व्यवस्थापक एम्.के.सी.एल यांचे दि.१४.०६.२०२१ रोजीच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे एम्.के.सी.एल या संस्थेकडून विविध शुल्कांचे एकूण रक्कम रू.१०,६०,०४३/– विश्वविद्यालयाचे उत्पन्न खाते क्र.८७४४१०११००१११५० या खात्यात चुकीने जमा झाले असल्याने ही रक्कम परत करण्याबाबत संस्थेने विनंती केली होती. सदर रक्कमेची पडताळणी केली असता ही रक्कम विश्वविद्यालयाच्या उत्पन्न खात्यात जमा झाल्याचे दिसून आले. त्यामुळे ही रक्कम त्याच खात्यातून मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार रू.१०,६०,०४३/– धनादेश क्र. ०७४६३४ दि.१७.०६.२०२१ अन्वये एम्.के.सी.एल या संस्थेला NEFT द्वारे वळती करण्यात आली. सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

Scanned with Oken Scanner

निर्णय:– **सभेने याची नोंद घेतली. अंकेक्षकाकडून यासंदर्भात पत्र घ्यावे.**

बाब क्र.८.०६ **बी.एड्. विभागाकरिता विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिष्यवृत्ती देय करण्यासाठी नवीन खाते उघडल्याबाबत.**

सादर करण्यात येते की, विश्वविद्यालयाच्या बी.एड्. विभागातील विद्यार्थ्यांना यापुढे शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीने देय करावयाची असल्याने मा.वित्त व लेखा अधिकारी यांनी रामटेक येथील एच.डी.एफ.सी. या बॅंकेच्या शाखेत शिष्यवृत्तीसाठी नवीन खाते उघडण्याबाबत सूचित केले. त्यानुसार संबंधित बॅंकेत नवीन खाते उघडण्यात आले आहे.

सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णय:– **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र.८.०७ **एम्.एड्. आणि पी.जी. विभागाकरिता विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिष्यवृत्ती देय करण्यासाठी नवीन खाते उघडल्याबाबत...**

सादर करण्यात येते की, विश्वविद्यालयाच्या एम्.एड्. आणि पी.जी. विभागातील विद्यार्थ्यांना यापुढे शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीने देय करावयाची असल्याने मा. वित्त व लेखा अधिकारी यांनी रामटेक येथील एच.डी.एफ.सी. या बॅंकेच्या शाखेत शिष्यवृत्तीसाठी नवीन खाते उघडण्याबाबत सूचित केले. त्यानुसार संबंधित बॅंकेत नवीन खाते उघडण्यात आले आहे.

सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णय:– **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र. ८.०८ **झिरो बॅलेन्स सब्सीडरी खाते उघडण्याबाबत...**

सहसंचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांचेकडून प्राप्त झालेल्या ई–मेल पत्रात नमूद केल्याप्रमाणे या योजनेंर्गत विविध कामाकरिता प्राप्त होणारे अनुदान जमा करण्यासाठी झिरो बॅलेन्स सब्सीडरी खाते स्टेट बॅंक ऑफ इंडिया या शाखेत खाते उघडण्याबाबत सूचित करण्यात आले होते. त्यानुसार स्टेट बॅंक ऑफ इंडिया, रामटेक येथे खाते क्र.४०३०१२७४५९७ उघडण्यात आले आहे.

सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णय:– **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र.८.०९ **रूसा योजनेंतर्गत विश्वविद्यालयास प्राप्त निधीतून मिळालेल्या व्याजाची रक्कम वळती केल्याबाबत...**

राज्य प्रकल्प सहसंचालक, (प्र.) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांचेकडून विश्वविद्यालयास दि.२८.०६.२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झाले. रूसा योजनेंतर्गत विश्वविद्यालयास भौतिक सुविधेच्या विकासाकरिता रू. १५.०० कोटी निधी प्राप्त झाला आहे. विश्वविद्यालयास या प्राप्त निधीपासून मिळालेल्या व्याजाची रक्कम रू.३७,४३,०६५/– संचालनालयाच्या बॅंक खात्यात RTGS/NEFT द्वारे जमा करावी असे सदर पत्रात नमूद आहे. त्यानुसार रक्कम रू.३७,४३,०६५/– महाराष्ट्र स्टेट हायर एज्युकेशन कॉन्सील यांचे स्टेट बॅंक ऑफ इंडिया, मुंबई येथील खाते क्र. ३५२११४०२०७७ मध्ये धनादेश क्र. ०२३९५४ दि.२०.०७.२०२१ नुसार RTGS/NEFT द्वारे जमा करण्यात आली आहे.

सबब ही बाब सभेच्या माहितीस्तव प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णय:– **सभेने याची नोंद घेतली.**

Scanned with Oken Scanner

**बाब क्र.८.१० विश्वविद्यालयाच्या विविध विभागाकरिता विविध साहित्य, छपाई, जाहिरात, व इतर बाबींसाठी साधारण निधी खात्यातून झालेल्या खर्चाच्या शोधनाबाबत..**

प्रस्तुत विश्वविद्यालयाच्या विविध विभागांसाठी खरेदी व इतर अनुषंगिक खर्चाच्या शोधनासाठी नियमानुसार न्यूनतम दर मान्य असलेल्या प्रतिष्ठानांकडून निविदा प्रक्रिया/दरपत्रक प्रक्रिया पूर्ण करुन खालील विवरणानुसार वस्तु/साहित्य खरेदी केलेले आहेत. खरेदी करण्यात आलेल्या वस्तु/साहित्याची नोंद स्टॉकबुक मध्ये घेण्यात आलेल्या आहेत. तसेच इतर अनुषंगिक खर्चाचे शोधन मा.कुलगुरुंच्या मान्यतेने बँक ऑफ इंडिया, येथील खाते क्र.३१५७ आणि एच्.डी.एफ. सी बँकेतून ऑनलाईन पद्धतीने मधून त्या – त्या संबंधित प्रतिष्ठानाचे नावे देय करण्यात आलेले आहे. याचा एकत्रित खर्चाचा तपशील हा खालीलप्रमाणे आहे.

| क्र | विवरण | प्रतिष्ठानाचे नांव | अदा केलेली रक्कम | बँक खाते | धनादेश क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Employee Group Medical Insurance | The New India Insurance Co.Ltd. | 283693.00 | | 112001 dt.01.04.21 |
| 2. | Security Exp. | M/s Unity Security Force | 222358.00 | | 112006 dt.04.04.21 |
| 3. | Tv Purchase Exp. | M/s Fairdale Arcade, Nagpur | 129000.00 | | 112021 dt.19.04.21 |
| 4. | Yoga Instruments | M/s Elite Infra Associates, Nagpur | 291507.00 | | 112034 dt.22.04.21 |
| 5. | Yoga Instruments | M/s Elite Infra Associates, Nagpur | 171475.00 | | 112035 dt.22.04.21 |
| 6. | Computer & Accessories, Networking | M/s Vab Technologists, Nagpur | 279394.00 | BOI | 112053 dt.04.05.21 |
| 7. | Computer & Accessories, Networking | M/s Vab Technologists, Nagpur | 274344.00 | | 112054 dt.04.05.21 |
| 8. | Computer & Accessories, Networking | M/s Vab Technologists, Nagpur | 291224.00 | A/C. No. 3157 | 112055 dt.04.05.21 |
| 9. | Security Exp. | M/s Unity Security Force | 222358.00 | | 112065 dt.05.05.21 |
| 10. | Advertisement Exp. | M/s Profit Adv,Pvt.Ltd.Nagpur | 108360.00 | | 112073 dt.06.05.21 |
| 11. | Printing, Repairing, Butification Exp. | M/s Gokul Hardware, Ramtek | 186529.00 | | 112074 dt.12.05.21 |
| 12. | Furniture & Fixture | M/s Ramtek Glass & Plywood Works | 106871.00 | | 112084 dt.19.05.21 |
| 13. | Covid – 19 Donation | C.M Fund | 360763.00 | | 112103 dt.19.07.21 |
| Total - A | | | 2927876.00 | | |
| 14. | Furniture & Fixture | M/s Ramtek Glass & Plywood Works | 156490.00 | | By E- Transfer Fund dt.01.04.21 |
| 15. | Furniture & Fixture | M/s Mohit Enterprises, Ramtek | 164461.00 | | By E- Transfer Fund dt.02.06.21 |
| 16. | Security Exp. | M/s Unity Security Force | 222358.00 | | By E- Transfer Fund dt.09.06.21 |
| 17. | Equipment | M/s Vido Incorporation, Nagpur | 105872.00 | | By E- Transfer Fund dt.15.06.21 |
| 18. | Printing, Repairing, Butification Exp. | M/s Natraj Art & Culture Center, Nagpur | 100000.00 | | 079746 dt.12.01.21 |
| 19. | Air Condinor | M/s Mehta Enterprises, | 435125.00 | HDFC Bank A/c No.62628 | By E- Transfer Fund dt.29.06.21 |
| 20. | Advance to chandrapur Forest Academy | chandrapur Forest Academy, Chandrapur | 129375.00 | | By E- Transfer Fund dt.07.07.21 |
| 21. | Computer & Accessories, Networking | M/s Spectrum Services, Nagpur | 336000.00 | | By E- Transfer Fund dt.07.07.21 |
| 22. | Repair & Maintenance | M/s Methodex System Pvt. Ltd. Nagpur | 156896.00 | | By E- Transfer Fund dt.07.07.21 |

Scanned with Oken Scanner

| क्र | विवरण | प्रतिष्ठानाचे नांव | अदा केलेली रक्कम | बँक खाते | धनादेश क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 23. | Repair & Maintenance | M/s Methodex System Pvt. Ltd. Nagpur | 177744.00 | | By E- Transfer Fund dt.07.07.21 |
| 24. | Repair & Maintenance | M/s Methodex System Pvt. Ltd. Nagpur | 223818.00 | | By E- Transfer Fund dt.07.07.21 |
| 25. | Security Exp. | M/s Unity Security Force | 222358.00 | | By E- Transfer Fund dt.13.07.21 |
| 26. | Furniture & Fixture (Ratnagiri Sub Center) | M/s Roopraj Furnitur,Ratnagiri | 217661.00 | | By E- Transfer Fund dt.13.07.21 |
| 27. | Furniture & Fixture (Ratnagiri Sub Center) | M/s Roopraj Furnitur, Ratnagiri | 152934.00 | | By E- Transfer Fund dt.13.07.21 |
| 28. | Battery & Invertor | M/s Vardhit World, Nagpur | 238940.00 | | By E- Transfer Fund dt.16.07.21 |
| 29. | Repair & Maintance | M/s Isha Electrical Engg., | 294362.00 | | By E- Transfer Fund dt.20.07.21 |
| Total – B | | | 3334394.00 | | |
| Total – A+B | | | 6262270.00 | | |

करिता ही बाब सभेच्या कृतोत्तर वित्तीय मान्यतेस्तव ठेवण्यात येत आहे.

**निर्णयः–** **सभेने याविषयी चर्चा केली व आवश्यक ठिकाणी डॉ.रामचंद्र जोशी यांच्याकडून माहिती देण्यात आली. ज्या विभागांकडून/महाविद्यालयाकडून अथवा प्रतिष्ठानांचे डयुज बाकी आहे अशांची प्रत्येक विभागाने नोंद ठेवावी व त्याविषयीची माहिती सभेमधे द्यावी. असे सांगितले आणि सभेने यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र.८.११** **ग्रंथालय विभागाकरिता रुसा अनुदानातून केलेल्या उपस्कर खरेदीबाबत.**

ग्रंथालय विभागाकरिता रूसा अनुदानातून मे. स्पॅपटेक इंजिनिअरींग, अमरावती या प्रतिष्ठानाकडून जेम प्रणालीद्वारे रूसा अनुदानातून रू. १५,९६,०००/– चे उपस्कर खरेदी करण्यात आले. सदर प्रतिष्ठानाचे शोधन ऑनलाईन पद्धतीने पी.एफ.एम.एस द्वारा ॲडव्हाईस नं. सी०६२१२३८३०२३४ अन्वये दि.२१.०६.२०२१ रोजी मा.कुलगुरू यांच्या मान्यतेने करण्यात आलेले आहे. सबब ही बाब कृतोत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

**निर्णयः–** **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र.८.१२** **विश्वविद्यालयाच्या विविध बॅक खात्यांचा दि. २६.०७.२०२१ रोजीचा तपशील.**

विश्वविद्यालयाच्या विविध बॅक खात्याच्या आर्थिक तपशीलाची स्थिती सभेच्या माहिती तथा अवलोकनार्थ सादर.

**निर्णयः–** **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र.८.१३** **विश्वविद्यालयाचे अध्यापक महाविद्यालयाच्या विविध बॅक खात्यांचा दि.२६.०७.२०२१ रोजीचा तपशील.**

विश्वविद्यालयाचे अध्यापक महाविद्यालयाच्या विविध बॅक खात्याच्या आर्थिक तपशीलाची स्थिती सभेच्या माहिती तथा अवलोकनार्थ सादर.

**निर्णयः–** **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

Scanned with Oken Scanner

आस्थापना विभाग:— ९

बाब क्र. ९.०१ **संवैधानिक पदांच्या अतिरिक्त कार्यभाराबाबत.**

प्रस्तुत विश्वविद्यालयातील कुलसचिव आणि संचालक, नियोजन व विकास मंडळ ही दोन संवैधानिक शासन मान्य पदे रिक्त आहेत. विश्वविद्यालयाचे कामकाज सुचारू पद्धतीने चालण्याकरिता सदर पदांवर खालीलप्रमाणे शिक्षक आणि समकक्ष पदावर कार्यरत अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे.

| अ. क्र. | नाव व पदनाम | अतिरिक्त कार्यभाराचे पद | कार्यभाराचा प्रभार | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| १) | डॉ. विजयकुमार सी.जी. प्राध्यापक | कुलसचिव | ०१.०७.२०२१ | पुढील आदेशापर्यंत किंवा भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत. |
| २) | डॉ. प्रसाद गोखले, प्राध्यापक | संचालक, नियोजन व विकास मंडळ | ०१.०७.२०२१ | दि. ३१.१२.२०२१ पर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत |

उपरोक्त बाब सभेच्या माहिती करिता सादर करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र. ९.०२ **प्रस्तुत विश्वविद्यालयातील शिक्षकांना CAS अंतर्गत पदोन्नती/स्थाननिश्चिती बाबत.**

प्रस्तुत विश्वविद्यालयातील शिक्षकांना CAS अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नती देण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोग व शासन निर्णयानुसार पात्र उमेदवारांचे Screening-cum-Evaluation आणि Selection Committee ची सभा दि. १८.०१.२०२१ रोजी संपन्न झाली. त्यानुषंगाने समितीने केलेल्या शिफारसीनुसार स्थाननिश्चिती/पदोन्ती चा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | शिक्षकांचे नाव व पदनाम | स्थाननिश्चिती/पदोन्नती (Stage) | | स्थाननिश्चिती/पदोन्नतीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| | | From | To | |
| १ | डॉ. कलापिनी अगस्ती, सहयोगी प्राध्यापक | AL 13A | AL 14 | दि. २४/०२/२०२१ |
| २ | डॉ. किर्ती सदार, सहयोगी प्राध्यापक | AL 12 | AL 13A | दि. १५/०७/२०१६ |
| ३ | डॉ. पराग जोशी, सहायक प्राध्यापक | AL 11 | AL 12 | दि. १५/०१/२०२१ |
| ४ | डॉ. दिपक कापडे, सहायक ग्रंथपाल | AL 11 | AL 12 | दि. ०३/०३/२०२० |

वरीलप्रमाणे, संबंधित शिक्षकांच्या पदोन्नती/स्थाननिश्चिती संदर्भात आदेश निर्गमित करण्यात आले असून सभेच्या माहितीकरिता सदर बाब सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र. ९.०३ **प्रस्तुत विश्वविद्यालयातील विविध संकायांतर्गत प्राध्यापक पदावर झालेल्या नियुक्तीबाबत.**

Scanned with Oken Scanner

शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार प्रस्तुत विश्वविद्यालयातील शिक्षक संवर्गातील प्राध्यापक या पदासाठी दि. २५.०२.२०२० आणि दि. १२.०९.२०२० अन्वये प्रकाशित करण्यात आलेल्या जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या आवेदन पत्रांच्या छाननी उपरांत विहित प्रक्रियेच्या अवलंब करून दि. १८.०१.२०२१ रोजी मुलाखत आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने निवड समितीने केलेल्या शिफारसीनुसार आणि शासनाने पत्र दि. १९.०७.२०२१ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार प्राध्यापक पदावर निवड झालेल्या शिक्षकांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | शिक्षकांचे नाव व पदनाम | संकायाचे नाव | विभागाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | डॉ. कलापिनी अगस्ती, प्राध्यापक | भारतीय धर्म, तत्वज्ञान व संस्कृती | दर्शन विभाग |
| २ | डॉ. प्रसाद गोखले, प्राध्यापक | प्राचीन भारतीय विज्ञान व ललितकला | वेदांग ज्योतिष विभाग |
| ३ | डॉ. पराग जोशी, प्राध्यापक | संस्कृत तथा संस्कृतेतर भाषा | संस्कृत भाषा व साहित्य विभाग |

वरीलप्रमाणे, निवड झालेले शिक्षक हे प्रस्तुत विश्वविद्यालयातच कार्यरत असल्यामुळे त्यांनी धारण केलेल्या पदावर एक वर्षाकरिता धारणाधिकार मा. कुलगुरू यांच्या मान्यतेनुसार मंजूर करून संबंधित सर्व शिक्षकांना दि. १९/०७/२०२१ रोजी प्राध्यापक या पदावर रूजू करून घेण्यात आले आहे. करिता सभेच्या माहितीकरिता सदर बाब सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

निर्णयः— **सभेने याची नोंद घेतली.**

**बाब क्र. ९.०४ विश्वविद्यालयातील संवैधानिक पदाच्या नेमणूकीनिमित्त निवड समितीकरिता नामनिर्देशनाबाबत.**

प्रस्तुत विश्वविद्यालयातील कुलसचिव, ग्रंथपाल, संचालक, नियोजन व विकास मंडळ या रिक्त असलेल्या संवैधानिक पदांसाठी जाहिरात प्रकाशित करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यानुषंगाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम ३३/१९९७ मधील कलम ५८ मधील १(ब)(दोन) नुसार विहित करण्यात आलेल्या तरतूदीप्रमाणे ''व्यवस्थापन परिषदेने तिच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले दोन सदस्य'' असे असल्याने नामनिर्देशनाकरिता सदर बाब सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

निर्णयः— **सभेने दोनही सदस्य नामनिर्देशनाचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना प्रदान केले.**

<u>अभियांत्रिकी विभागः— १०</u>

**बाब क्र. १०.०१ Construction of Prefab Structure at Ramtek campus च्या कामाबाबत...**

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरातील प्रशासकीय इमारतीच्या दुस—या माळयावर Transit Office करिता Construction of Prefab Structure च्या कामाकरिता वास्तुविशारदीय सेवेबाबत वारंगा परिसरातील सभा दि. ११/०२/२०२१ रोजी प्रत्यक्ष चर्चा करण्यात आली. सदर सभेत बाब क्र. ०४ अन्वये WAPCOS LIMITED यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. WAPCOS LIMITED यांनी पत्र दि. १९/०७/२०२१ अन्वये सदर Construction of Prefab Structure च्या कामाचे अंदाजपत्रक व नकाशे सादर केलेले आहे.

१. त्यानुसार WAPCOS LIMITED यांनी ई—मेलद्वारे सदर कामाचे अंदाजपत्रक रू. २४,१०,६५३/— (with 12% GST) व नकाशे सादर केलेले आहे. ते सोबत जोडलेले आहे.

Scanned with Oken Scanner

वास्तुविशारदीय देयक अंदाजित खर्चास अनुसरून रू. ७३,९५९/– (with 18% GST) अपेक्षित आहे.

२. नकाशात दोन हॉल व एक टॉयलेट दर्शविलेले आहे. एकूण प्रस्तावित कामाचे क्षेत्रफळ १५८.०३ स्के. मि. आहे.

३. कामाचे दर हे सा. बां. विभागाच्या दरसूचीमध्ये समाविष्ट नाहीत. वास्तुविशारद यांनी संबंधित खाजगी प्रतिष्ठानाकडून Rupees per Sq. meter स्वरूपात प्राप्त करून विश्वविद्यालयास सादर केले आहे.

४. सदर अंदाजपत्रक हे Turnkey Project स्वरूपात असून त्यामध्ये खालील बाबी समाविष्ट आहेत.

Wall- Prefabricated Fibre cement Sandwich
Roof - Profile sheet
Structure- steel structure in MS tubular section.
Electrification, flase ceiling, floaring, sanitary fitting.

५. सदर इमारतीचे मूळ आर.सी.सी. स्ट्रक्चर हे G+1 स्वरूपाचे आहे. तरी सदर कामास व अंदाजपत्रकास मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

निर्णय :– सदर काम करण्यापूर्वी इमारतीची Safety Certificate संबंधित Structural Designer यांचेकडून प्राप्त करण्याची सूचना सभेने केली. विश्वविद्यालयाच्या साधारण निधीतून विश्वविद्यालय स्तरावर ई–निविदेद्वारे काम पूर्ण करण्याची सूचना करण्यात आली. सभेने सदर कामास व क्र. १ मध्ये नमूद अपेक्षित खर्चास मान्यतेची शिफारस व्यवस्थापन परिषद सभेकडे करण्यात आली. सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**निर्णय:–** **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १०.०२ अतिथीगृहाच्या पहिल्या व दुस–या मजल्याच्या बांधकामाबाबत....**

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात संशोधक विद्यार्थी निवास व्यवस्थेसाठी अतिथीगृहाच्या पहिल्या मजल्याच्या विस्तारीकरणाच्या बांधकामाकरिता शासनाने रू. २,०५,०७,०००/– यास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. शासनाने प्रशासकीय मान्यतेपैकी खालीलप्रमाणे टप्प्या–टप्प्याने निधी विश्वविद्यालयास उपलब्ध करून दिलेला असून सदर प्राप्त एकूण निधी रू. १,०७,५०,०००/– सा. बां. विभागाकडे ठेव अंशदान योजनेतंर्गत जमा करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | शासन निर्णय | प्राप्त निधी | निधी उपयोजिता |
|---|---|---|---|
| १ | केएसयु–२०१९/प्र.क्र. ०२/विशि–२ दि.१३.११.२०१९ | रू. ३०,००,०००/– | धनादेश क. ००२५८० दि. १६.०३.२०२० सा. बां. विभागाकडे जमा पावती क्र.७१०५५६४ दि. १२.०५.२०२० |
| २ | केएसयु–२०१९/प्र.क्र. ०२/विशि–२ दि.२५.०३.२०२१ | रू. ७७,५०,०००/– | धनादेश क. ००२६०८ दि. २२.०५.२०२१ विश्वविद्यालयाचे पत्र दि. १५/०६/२०२१ |
| **एकुण प्राप्त निधी** | | **रू. १,०७,५०,०००/–** | |

सा. बां. विभागाद्वारे पहिल्या व दुस–या मजल्याचा बांधकामासाठी सा. बां. विभागाच्या तांत्रिक मान्यतेनुसार खर्च रू. ३,९२,६०,९७४/– अपेक्षित आहे. यामध्ये बांधकाम, विद्युत व सा. बां. विभागाचे टक्के शुल्क अंर्तभूत आहे. त्यापैकी निव्वळ बांधकामाकरिता झालेल्या निविदेनुसार सा. बां. विभागाने रू. २,२५,५८,३५७/– (+ 12% GST) कार्यादेश जारी केलेला असून दि. २३/०७/२०२१ रोजी कार्यारंभ आयोजित आहे.

Scanned with Oken Scanner

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात संशोधक विद्यार्थी निवास व्यवस्थेसाठी अतिथीगृहाच्या पहिल्या मजल्याच्या विस्तारीकरणाच्या बांधकामाकरिता प्रशासकीय मान्यता प्राप्त निधी रू. २,०५,०७,०००/— निधीतील शिल्लक रक्कम रू. ९७,५७,०००/— आर्थिक वर्ष २०२१—२२ मध्ये उपलब्ध करून देण्याबाबत विश्वविद्यालयाचे पत्र दि. १५/०६/२०२१, ०७/०७/२०२१ अन्वये शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे.
तरी सभेच्या माहिती व कृतोत्तर मान्यतेस्तव सादर.
वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.
निर्णय :—पहिला व दुसरा मजला बांधकामासाठी तांत्रिक मान्यता खर्च रू. ३,९२,६०,९७४/— व त्यासाठी बांधकाम कार्यदिश रू. २,२५,५८,३५७/— (+ 12% GST) याचे अवलोकन करून शासनाकडून पहिल्या मजल्याच्या बांधकामासाठी प्राप्त निधीतून दोन्ही मजल्याचा बांधकामास सुरूवात करण्याची सूचना करण्यात आली. जास्तीच्या लागणा—या निधीबाबत प्रस्ताव तयार करण्याची सूचना करण्यात आली.
सदर कामातील विद्युतीकरणाच्या कामासाठी स्वतंत्र Consultant नेमणूकीची कार्यवाही सा.बां. विभागाद्वारे करण्यात यावी व त्याकरिता सा. बां. विभागाच्या नियमानुसार लागणारे शुल्काची पूर्तता विश्वविद्यालयाद्वारे करण्यात येईल. सदर विद्युतीकरणाचे सादरीकरण (Presentation) दि. १०/०८/२०२१ रोजी विश्वविद्यालयास सादर करण्याची सूचना सा. बां. विभागास करण्यात आली. सदर बाब मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषद सभेकडे अग्रेषित करण्यात आली.
सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णय:— **सभेने यास मान्यता प्रदान केली. सोबतच सदर रक्कम प्राप्त होण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. असे निर्देश सभेने दिले.**

**बाब क्र. १०.०३ रामटेक परिसरातील "ज्ञानयोगी डॉ. श्रीकान्त जिचकार ज्ञानस्रोत केन्द्र" येथे मुख्यप्रवेशद्वारावर Design लावण्याबाबत....**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरातील "ज्ञानयोगी डॉ. श्रीकान्त जिचकार ज्ञानस्रोत केन्द्र" येथे मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस विश्वविद्यालयाच्या निवडीनुसार Mural with Canvas Painting Design तयार करून लावण्याबाबत विश्वविद्यालयाच्या संलग्नित असलेल्या धरमपेठ शिक्षण संस्थेच्या Natraj art culture Centre, Nagpur या महाविद्यालयाने दि. १०/०७/२०२१ अन्वये एकूण खर्च रू. ९०,०००/— चा प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रस्ताव सोबत जोडलेले आहे.
सदर कार्य हे सदर महाविद्यालयातील तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यार्थ्यांचा यातील सहभाग हा ''कमवा व शिका" या योजनेअंतर्गत पूर्ण करण्यात येणार असल्याचे नमूद आहे. याकरिता संबंधित विद्यार्थी आणि तज्ञ यांना प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे मानधन देय करण्यात येणार आहे.
तरी सदर कार्य Natraj art culture Centre, Nagpur यांचेकडून पूर्ण करण्याच्या व एकूण खर्च रू. ९०,०००/— मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला. निर्णय :— सभेने यास मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषद सभेकडे शिफारस केली.
सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णय:— **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

Scanned with Oken Scanner

**बाब क्र. १०.०४ विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात मुलींचे वसतीगृह बांधकामाचे सुधारित नकाशे मंजुरीस्तव व सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याबाबत..**

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात मुलींच्या निवास व्यवस्थेकरिता वसतीगृह बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित करून दिलेले नकाशे व अंदाजपत्रक रू. १३,४६,३०,६३८/— यास प्रशासकीय मान्यता प्रदान करून निधी उपलब्ध करून देण्याबाबत विश्वविद्यालयाने दि.१४/०९/२०२० अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे.

यास अनुसरून मा. संचालक, उच्च शिक्षण यांनी पत्र क्र.युएनआय/ककासंवि/रामटेक/ मुलींचे वसतीगृह/ विस्तारीकरण/विशि—१ /१३३४ दि. ०२/०२/२०२१ अन्वये रामटेक परिसरात मुलींच्या निवास व्यवस्थेकरिता वसतीगृह बांधकामासाठी प्रशासकीय आणि वित्तीय मान्यतेसाठी शासनाकडे शिफारस केलेली आहे.

सदर बांधकामाच्या वास्तुविशारदीय सेवेसाठी विश्वविद्यालयाने Head of the Design Cell, Smt. Manoramabai Mundle College of Architechture, Nagpur यांची नियुक्ती केलेली आहे. त्यानुसार संबंधित वास्तुविशारद यांनी सदर वसतीगृहाचे नकाशे विश्वविद्यालयास उपलब्ध करून दिलेले आहे. नकाशे सोबत जोडलेले आहे.

याबाबत शासनाने पत्र क्र.युएनआय/२०२१/ककासंवि /रामटेक / मुलींचे वसतीगृह/ विशि—१/७३१५ दि. २५/०६/२०२१ अन्वये काढण्यात आलेल्या त्रुटींची पूर्तता करून सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत कळविलेले आहे. पत्र सोबत जोडलेले आहे.

तरी सदर नकाशे मान्यतेस्तव व सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.१३ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

निर्णय :— सदर नकाशास मान्यता देण्यात आली. त्यानुसार जोता दरानुसार अंदाजपत्रक तयार करण्याची सूचना वास्तुविशारद यांना देण्यात आली व त्यास सा. बां. विभागाचे प्रमाणीकरण घेवून सुधारित प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याची सूचना करण्यात आली. सदर बाब मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेकडे अग्रेषित करण्यात आली.

तरी सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**निर्णयः—** **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १०.०५ रामटेक परिसरातील मा. कुलगुरू कार्यालयाचे नूतनीकरणातील बांधकाम, विद्युतीकरण व A.C लावण्याच्या कामाबाबत.**

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरातील मा. कुलगुरू कार्यालयातील व वित्त विभागातील बांधकाम, पार्टीशन, फर्निचर, False ceiling, Air Conditioning, Electrification, इ. कामे करून नूतनीकरण करणे प्रस्तावित आहे. सदर कामाच्या वास्तुविशारदीय सेवेसाठी नियुक्त ARTRIO GLOBAL PVT. LTD (Shweta Deshpande) यांनी याबाबत दि. १६/०७/२०२१ रोजी मा. कुलगुरू महोदय यांना 3D Presentation दाखविण्यात आले. त्यानुसार मा. कुलगुरू महोदयांनी फेरबदल सुचविलेले आहेत. त्याबाबत सुधारणेसह वास्तुविशारद यांनी अंदाजपत्रक रू. २१,९०,१३४/— सादर केलेले आहे. सदर नूतनीकरणाच्या कामास व अंदाजित खर्च रू. २१,९०,१३४/— यास मान्यतेस्तव व सदर काम विश्वविद्यालय स्तरावर E-tendering द्वारे पूर्ण करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.१४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

Scanned with Oken Scanner

निर्णय :– सदर कामास, वास्तुविशारद नेमणुकीस, वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या नकाशास व अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. विश्वविद्यालयाच्या साधारण निधीतून विश्वविद्यालय स्तरावर ई–निविदेद्वारे काम पूर्ण करण्याची सूचना करण्यात आली. सदर बाब मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेकडे अग्रेषित करण्यात आली. सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णय:– **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १०.०६ **रामटेक परिसरातील मा. कुलगुरू कार्यालयाचे नूतनीकरणातील फर्निचर खरेदी करण्याच्या कामाबाबत.**

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरातील मा. कुलगुरू कार्यालयात व वित्त विभागात नवीन फर्निचर खरेदी करून नूतनीकरण करणे प्रस्तावित आहे. सदर कामाच्या वास्तुविशारदीय सेवेसाठी नियुक्त ARTRIO GLOBAL PVT. LTD (Shweta Deshpande) यांनी याबाबत दि. १६/०७/२०२१ रोजी मा. कुलगुरू महोदय यांना 3D Presentation दाखविण्यात आले. त्यानुसार मा. कुलगुरू महोदयांनी फेरबदल सुचविलेले आहेत. त्याबाबत सुधारणेसह वास्तुविशारद यांनी अंदाजपत्रक रू. २१,६०,४५५/– सादर केलेले आहे. सदर नूतनीकरणाच्या कामास व अंदाजित खर्च रू. २१,६०,४५५/– यास मान्यतेस्तव व सदर काम विश्वविद्यालय स्तरावर E-tnedering द्वारे पूर्ण करून घेण्याच्या मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.१५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.
निर्णय :– सदर कामास, वास्तुविशारद नेमणुकीस, वास्तुविशारद यांनी सादर केलेल्या नकाशास व अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली. विश्वविद्यालयाच्या साधारण निधीतून विश्वविद्यालय स्तरावर GeM (Government e- Market) द्वारे काम पूर्ण करण्याची सूचना करण्यात आली. सदर बाब मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेकडे अग्रेषित करण्यात आली.
सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णय:– **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १०.०७ **Ramtek Campus येथील New Landscape मधील अतिरिक्त कामाबाबत.**

उपरोक्त विषयान्वये विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात New Landscaping work, Maintenance of the Campus Landscape कामाबाबत दि. २५/०१/२०२१ रोजी Chandrapur Forest Academy, Chandrapur यांच्याशी विश्वविद्यालयाद्वारे Memorandum of Understanding करण्यात आलेला आहे.

सदर कामाच्या कार्यदिश व MOU नुसार खालीलप्रमाणे एकुण खर्च रू. १०,३५,०००/– आहे.

| Sr.No. | Discription | Amount |
|---|---|---|
| 1) | New Landscape work at Ramtek Campus estimate | 10,00,000/- |
| 2) | Consulatnacy Charges @ 3.5 % (Including GST and other govt. taxes) | 35,000/- |
| | Total | 10,35,000/- |

उपरोक्तप्रमाणे कामाचे ५० टक्के रू. ५,१७,५००/– अग्रीम धनादेश क्र. ११२४५७ दि. ११/०२/२०२१ अन्वये Chandrapur Forest Academy, Chandrapur यांना अदा करण्यात आलेले आहे.

सदर नवीन उद्यान तयार करण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले असून देयक अदा करण्याची कार्यवाही सुरक्षा विभागाकडे सुरू आहे.

Scanned with Oken Scanner

मूळ प्रस्तावाव्यतिरिक्त खालीलप्रमाणे अधिकची कामे करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार Chandrapur Forest Academy, Chandrapur यांनी खालीलप्रकारे कामनिहाय प्राथमिक अंदाजपत्रक सादर केलेले आहे. ते सोबत जोडलेले आहे.

| Sr.No | Name of Additional Work | Estimated Cost |
|---|---|---|
| 1 | Butterfly Garden near ladies Hostel | 7,50,000.00 |
| 2 | Chain link fencing outside the main compound wall | 8,24,150.00 |
| 3 | Cement pots for keeping along road side and near hostels | 2,42,500.00 |
| 4 | Curb wall wherever required in front of main building | 7,07,700.00 |
| 5 | Additional drip irrigation done in the campus | 2,99,903.00 |
| 6 | Retaining wall along the canal at enterance of the gate | 1,50,000.00 |
| 7 | Miyawaki plantation | 6,43,155.00 |
| | **Total** | **36,17,408.00** |

रामटेक परिसरातील नवीन उद्यान तयार करण्याचे कामाव्यतिरिक्त उपरोक्तप्रमाणे कामास व खर्चास मान्यतेस्तव तसेच निधी तरतूदीबाबत पुढील आदेशार्थ सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.२४ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला. निर्णय :–अ.क्र. २ वरील Chain link fencing काम हे विद्यापीठ परिसराच्या बाहेर आहे. भविष्यात रस्त्याचे रूंदीकरण असल्यामुळे सदर काम रद्द करण्यात आले.

अ. क्र. २ चे काम वगळता इतर कामांचे अंदाजपत्रक, नकाशा तपशिल Chandrapur Forest Academy, Chandrapur यांच्याकडून प्राप्त करण्याची सूचना करण्यात आली. सदर कामाबाबत व निधी उपलब्धतेबाबत निर्णयार्थ व्यवस्थापन परिषद सभेकडे अग्रेषित करण्यात आले.

सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णय:– **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १०.०८ **वारंगा परिसर येथील संरक्षण भिंत, प्रवेशद्वार व सुरक्षा चौकी बांधकामाबाबत....**

विश्वविद्यालयाच्या वारंगा परिसरात संरक्षण भिंत, प्रवेशद्वार व सुरक्षा चौकी बांधकामासाठी विश्वविद्यालयाने पत्र दि. ११/१०/२०१९ अन्वये दोन टप्प्यात (रू. १.०० कोटी, १.५० कोटी) सा. बां. विभागाकडे एकूण रक्कम रू. २.५० कोटी व तिस–या टप्यात रू. ८०.०० लक्ष धनादेश क्र.०२३९३४ दि. २९/०१/२०२१ अन्वये सा. बां. विभाग क्र. ३, नागपूर यांचेकडे जमा केलेले आहे. सदर संरक्षण भिंतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून प्रवेशद्वार व सुरक्षा चौकीचे बांधकाम सुरू आहे. सा. बां. विभागाने पत्र दि.१५/०६/२०२१ अन्वये सदर बांधकामे दि. ३१/०७/२०२१ पर्यत पूर्ण करण्यात यावे अन्यथा दंड आकारण्याबाबत संबंधित कंत्राटदारास कळविलेले आहे.

सदर ठिकाणी मा. कुलगुरू, मा. कुलसचिव मा. संचालक, वारंगा परिसर यांनी प्रत्यक्ष पाहणी दरम्यान सदर सुरक्षा चौकीच्या बांधकामात टॉयलेटमधील सॅनेटरी आणि पाणी पुरवठा करण्याची सूचना केली. त्यानुसार संबंधित वास्तुविशारद नंदकिशोर कुकडे ॲन्ड असोसिएट्स, नागपूर यांनी सदर कामाचे कामाचे अंदाजपत्रक रू. ६,६१,६७७/– व नकाशे सादर केलेले आहे. सोबत जोडलेले आहे. तरी सदर खर्च रू.६,६१,६७७/– सभेच्या मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.१६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला. निर्णय :– सदर कामाच्या विलंबामुळे सभेने संबंधित कंत्राटदार यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित कंत्राटदार आदित्य कन्स्ट्रक्शन, नागपूर यांनी विद्यापीठ परिसर रामटेक येथील ॲकेडमिक स्कुल इमारत व ॲकेडमिक रिसर्च सेंटर इमारत बांधकामासाठी

Scanned with Oken Scanner

अतिशय विलंब लावलेला आहे. या कारणाने विद्यापीठ संबंधित कोणत्याही विकास कामाकरिता आदित्य कन्स्ट्रक्शन, नागपूर यांना संधी देण्यात येवू नये. अशी सूचना सा. बां. विभागास करण्यात आली. तसेच सुरू असलेल्या कामांची गती वाढवून दि. १५/०९/२०२१ पर्यंत सदर कामे पूर्ण करण्याची सूचना सा. बां. विभागास करण्यात आली. तसेच सुरक्षा कक्षातील, पीओपी, प्रसाधनगृहाच्या सॅनिटरी, पाणी पुरवठा इ. सोयीकरिता लागणा–या अंदाजपत्रक रू. ६,६१,६७७/– यास मान्यता देण्यात आली व प्रत्यक्ष खर्चाची पूर्तता सां. बा. विभागाकडे जमा विकास निधीतून करण्याची सूचना करण्यात आली. सदर बाब मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषद सभेकडे अग्रेपित करण्यात आली. सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णयः– **संबंधित खर्च रुसा निधीमधुन करण्यात आला आहे. यास सभेने मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १०.०९ वारंगा परिसरात Centre for Excellence for Indological Studies Building चे बांधकामाबाबत.**

विश्वविद्यालयाच्या वारंगा परिसरात Centre for Excellence for Indological Studies इमारत बांधकाम विश्वविद्यालयास प्राप्त रूसा अंतर्गत प्राप्त निधीतून सा. बां. विभागाकडून ठेव अंशदान योजनेतंर्गत करणे प्रस्तावित आहेत. सदर बांधकामाकरिता विश्वविद्यालयाद्वारे नियुक्त वास्तुविशारद WAPCOS Limited यांनी पत्र दि. 04/03/2021 अन्वये सदर बांधकामाचे अंदाजपत्रक रू. ६,२८,५६,७६३/– व विस्तृत नकाशे विश्वविद्यालयास सादर केलेले आहे. सदर अंदाजपत्रक व नकाशाची तपासणी करून सदर इमारतीच्या बांधकामाकरिता आवश्यक निधी कळविण्याकरिता विश्वविद्यालयाने सा. बा. विभागास कळविलेले होते.

त्यानुसार सा. बां. विभागाने पत्र क्र. ८९४/अथ/२०२१ दि. ०५/०३/२०२१ अन्वये सदर Centre for Excellence for Indological Studies इमारत बांधकाम कार्यान्वित करण्याकरिता ५० टक्के रक्कम रू. ३००.०० लक्ष जमा करण्याबाबत कळविलेले आहे. त्यानुसार विश्वविद्यालयाने धनादेश क्र. ०२३९४८ दि. ०६/०३/२०२१ अन्वये रू २,००,००,०००/– सा. बां. विभागाकडे जमा केलेले आहे. तसेच विश्वविद्यालयाचे पत्र क्र. ककासंवि/अभि/२०२१/ दि. १६/०७/२०२१ बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा, रामटेक द्वारा रू. ८८.०० लक्ष सा. बां. विभाग क्र. ३, नागपूर यांचेकडे जमा केलेले आहे.

वास्तुविशारद WAPCOS Limited यांनी दि. २२/०७/२०२१ च्या ई–मेल नुसार सदर बांधकामास अंदाजित खर्च रू. ९,२२,६१,६४८/– अपेक्षित आहे असे कळविले आहे. त्याचा तपशिल उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा सुरू आहे. तरी सभेच्या माहिती व कृतोत्तर मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.१९ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

निर्णय :– सदर नकाशे व अंदाजपत्रकाच्या तांत्रिक तपासणीकरिता सा. बां. विभागाकडे पाठविण्याची सूचना करण्यात आली. सदर नकाशे व अंदाजपत्रक रू. ९,२२,६१,६४८/– यास मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषद सभेकडे अग्रेपित करण्यात यावे.

सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णयः– **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १०.१० Additional Architectural Service for Construction of Centre for Excellence for Indological Studies Building**

विश्वविद्यालयाच्या वारंगा परिसरात Centre for Excellence for Indological Studies इमारत बांधकाम विश्वविद्यालयास प्राप्त रूसा अंतर्गत प्राप्त निधीतून सा. बां. विभागाकडून ठेव अंशदान योजनेतंर्गत करणे प्रस्तावित आहेत. सदर बांधकामाकरिता विश्वविद्यालयाद्वारे नियुक्त वास्तुविशारद

Scanned with Oken Scanner

WAPCOS Limited यांनी इमारतीच्या बांधकाम खर्च वगळून विद्युतीकरण, फर्निचर, Air Conditioner, Smart Classroom चे कामाचे Block Estimate रू. २,७२,७२,०००/– सादर केलेले आहे. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकासाठी वास्तुविशारदीय एकूण शुल्काच्या 2.6% म्हणजेच रू.७,०९,०७२/– मागणी केलेली आहे.

सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.२० अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

निर्णय :– वास्तुविशारदीय शुल्काबाबत चर्चा करण्यात आली व सदर कामाच्या एकूण खर्चाच्या २% वास्तुविशारदीय शुल्क देण्याचे ठरले, सदर कामास व प्राथमिक खर्चास मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषद सभेकडे अग्रेषित करण्यात आली.

सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णय:– **यासंदर्भात सभेत सविस्तर चर्चा झाली व उपरोक्त कामाच्या एकूण खर्चाच्या २.६% यानुसार येणारा खर्च अतिशय कमी असून इतर ठिकाणी तो ४% आहे. त्यामुळे एकूण खर्चाच्या २.६% वास्तुविशारदीय शुल्क देण्यास सभेने मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १०.११ Construction of Prefab Structure at Waranga campus च्या कामाबाबत**

विश्वविद्यालयाच्या वारंगा परिसरात Construction of Prefab Structure च्या कामाकरिता वास्तुविशारदीय सेवेबाबत वारंगा परिसरातील सभा दि. ११/०२/२०२१ रोजी प्रत्यक्ष चर्चा करण्यात आली. सदर सभेत बाब क्र. ०४ अन्वये WAPCOS LIMITED यांची २.६% प्रमाणे नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर कामातील Plinth Level पर्यतचे काम संरक्षण भिंतीच्या कामातंर्गत करणे प्रस्तावित आहे. Plinth Level पर्यतच्या कामाचे संबंधित वास्तुविशारद श्री कुकडे यांनी रू. १३,६३,७४५/– अंदाजपत्रक सादर केलेले आहे. सोबत जोडलेले आहे.

विश्वविद्यालयाने WAPCOS LIMITED यांना विश्वविद्यालयाचे पत्र दि. १७/०३/२०२१ अन्वये सदर Construction of Prefab Structure च्या कामाचे अंदाजपत्रक व नकाशे सादर करण्याबाबत कळविलेले होते. त्यानुसार WAPCOS LIMITED यांनी त्यांचे पत्र दि. २१/०६/२१ अन्वये सदर कामाचे अंदाजपत्रक रू. ४५,२०,८८०/– व नकाशे सादर केलेले आहे. ते सोबत जोडलेले आहे. सदर अंदाजपत्रक Non CSR प्रमाणे तयार करण्यात आलेले आहे. तरी कामास व अंदाजित खर्च रू. ४५,२०,८८०/– मान्यतेस्तव व निधी उपलब्धतेच्या मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.२१ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

निर्णय :– सदर कामास तूर्तास स्थगिती देण्यात आली. याबाबतचे निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. कुलगुरू महोदयांना देण्यात आले. मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषद सभेकडे अग्रेषित करण्यात आले. सभेच्या मान्यतेस्तव सादर.

निर्णय:– **विश्वविद्यालयाद्वारे WAPCOS LIMITED यांच्या कामास तूर्तास स्थगिती देण्यात आली आहे. सदर कार्य सहा महिन्यात पूर्ण झाले असते तर याचा फायदा विश्वविद्यालयाला झाला असता. तरी डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, संचालक, वारंगा परिसर, यांनी तयार असलेल्या बेसचे काय करता येईल याचा विचार करून संबंधित प्रस्ताव सभेला सादर करावा.**

**बाब क्र १०.१२ वारंगा परिसरात तलाव तयार करण्याच्या कामाबाबत...**

विश्वविद्यालयाचे वारंगा परिसर येथे दि. ११/०२/२०२१ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून परिसरात असलेले नैसर्गिकरीत्या जमा होणा–या पाण्याची साठवण करून तलाव स्वरूपात करण्याचे प्रस्तावित आहे. श्री. अशोक मस्के, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

Scanned with Oken Scanner

यांची तज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मा. कुलगुरू महोदयांनी दि. ०५/०६/२०२१ रोजी पत्रान्वये मा. ना. श्री नितीनजी गडकरी, केंद्रीय मंत्री यांना सदर कामासाठी यंत्रसामुग्री व्यवस्था व जलतज्ञ श्री कोटस्थाने यांच्या मार्गदर्शन मिळण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. त्यास अनुसरून दि. २३/०६/२०२१ रोजी मा. कुलगुरू, मा. कुलसचिव, मा. संचालक, वारंगा परिसर, श्री कोटस्थाने, श्री मस्के व इतर अधिकारी यांच्या उपस्थित प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करण्यात आली व दि. ०१/०७/२०२१ रोजी मा. संचालक, वारंगा परिसर, श्री कोटस्थाने यांच्या उपस्थितीत परिसराची पाहणी करण्यात आली. त्यानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**अ)** तलाव निर्मितीच्या कामाच्या कामाकरिता नियुक्त तज्ञ श्री अशोक मस्के, पंजाबराव कृषी विद्यापीठ यांनी नकाशा व खालीलप्रमाणे अंदाजपत्रक सादर केलेले आहे ते सोबत जोडलेले आहे.

अंदाजपत्रकानुसार खालीलप्रमाणे तपशील नमूद आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | खोदकाम खर्च | ६,३०९३४.१३ |
| २ | स्टोन पिर्चीग (केवळ ईनलेट व आउटलेट ठिकाणी) खर्च | ८४८९.०० |
| | एकूण | ६,३९४२३.१३ |
| ३ | जी.एस.टी. १२ % | ७६,७३०.७८ |
| | **खर्च** | **७,१६,१५३.९०** |
| ४ | तज्ञ श्री मस्के यांचे मानधन एकूण खर्चाच्या १०% | **७१,६१५.००** |
| | **एकूण खर्च** | **७,८७,७६८.००** |

**ब)** याबाबत पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी, संस्था, प्रतापनगर, वर्धा चे सचिव श्री माधव गोविंद कोटस्थाने यांनी विद्यापीठास दिलेले पत्र दि.०७/०७/२०२१ अवलोकनार्थ सादर.

सदर पत्रामध्ये असे नमूद आहे की,

- वारंगा येथे तलाव खोदकामासाठी लागणारे पोकलॅन मशीन व त्याचा ऑपरेटर त्यांच्या संस्थेकडून विनाशुल्क उपलब्ध करून देण्यात येईल.
- पोकलॅनला लागणारे इंधन, ०१ टिप्पर, टिप्पर चालक, टिप्परला लागणारे इंधन, पोकलॅन ऑपरेटर करिता भोजन व निवारा व्यवस्था याबाबतचे नियोजन व खर्च विद्यापीठाद्वारे करावयाचा आहे. दररोज अंदाजे १५० लिटर इंधन पोकलेनकरिता लागणार आहे.
- सदर काम दररोज ८ तास विना अडथळा(पाउस, मशीन बिघाड इ.) आल्यास २० दिवसात पूर्ण होणे अपेक्षित आहे.
- याकरिता विद्यापीठास ५ ते ६ लक्ष अंदाजित खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे "अ" नुसार सादर केलेला खर्च निविदा प्रक्रिया करून कमी/जास्त निश्चित करता येईल.

तसेच "ब" नुसार सादर केलेला खर्च प्रत्यक्ष कामाच्या वेळी पोकलॅनला लागणा—या इंधनावर अवलंबून आहे. त्यात कमी/जास्त होवू शकतो.

| | |
|---|---|
| वारंगा येथे करावयाच्या कामाच्या जागेचे क्षेत्रफळ | — ८,७७० स्के.मि. आहे. |
| तलावात पाण्याची क्षमता | — २८,२९७,.२१ क्युबिक.मिटर |
| म्हणजेच | — २८,२२,९७,२१० लिटर |

Scanned with Oken Scanner

वास्तुविशारद श्री नंदकिशोर कुकडे यांनी सादर केल्याप्रमाणे रिटनिंग वॉल बॅक फिलिंग, मुख्य प्रवेशद्वार ठिकाणी रॅम्प तयार करण्यासाठी फिलींग करणेसाठी एकुण ७३९ क्यु.मिटर मुरूम लागत आहे. तलावात निघणारा मुरूम सदर ठिकाणी टाकण्यास उपलब्ध होवू शकतो.

याप्रमाणे उपरोक्त ''अ'' व ''ब'' दोन पर्यायापैकी निवड करण्यासाठी प्रस्तुत विशेष समितीची सभा ओयाजित करण्याबाबत मा. कुलगुरू महोदयांनी सूचना केली आहे.

त्यानुसार दि. ०९/०७/२०२१ रोजी सभा संपन्न झाली. सभेचा निर्णय खालीलप्रमाणे आहे.

*निर्णय* :– सदर कामाकरिता पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी, संस्था, प्रतापनगर, वर्धा चे सचिव श्री. माधव गोविंद कोटस्थाने यांनी विद्यापीठास दिलेले पत्र दि.०७/०७/२०२१ अन्वये मागणी केल्यानुसार पोकलॅनकरिता इंधन, ऑपरेटर करिता भोजन व्यवस्था, राहण्याची सोय, टिप्पर, टिप्पर करिता इंधनची व्यवस्था विश्वविद्यालयाद्वारे पुरविण्याचे ठरले. सदर काम श्री. अशोक मस्के, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे मार्गदर्शनात करण्याचे ठरले. याबाबत श्री मस्के यांना प्रत्यक्ष ठिकाणी Per Visit Rs. 5000/- प्रमाणे मानधन देय करण्याचे ठरले. यामध्ये श्री मस्के यांनी कामाचे अंदाजपत्रक व नकाशे तयार करणे, कामाची देखरेख व प्रमाणीकरण करणे समाविष्ट आहे.

सदर कामासाठी टिप्पर भाडयाने घेण्यासाठी दरपत्रक प्रक्रिया करून कार्यवाही करण्याची सूचना केली. तसेच इंधन खरेदीचे काम उपलब्धतेनुसार निकटच्या पेट्रोलपंपवरून करण्यात यावे व त्याचे देयक अग्रीममधून देय करण्यात यावे.

सदर समितीने सदर कामाकरिता अंदाजित खर्च रू. ५ ते ६ लक्ष यास मान्यतेची त्याकरिता पहिल्या टप्प्यात रू. २.५० लक्ष अग्रीम देय करण्याची शिफारस केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे निर्णयानुसार विश्वविद्यालयाने पत्र दि.१४/०७/२०२१ अन्वये पूर्ती सिंचन समृध्दी कल्याणकारी, संस्था, प्रतापनगर, वर्धा चे सचिव श्री माधव गोविंद कोटस्थाने यांना सदर कामासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून देण्याबाबत कळविलेले आहे. परंतु मशीनरी दुरूस्ती अभावी अद्याप उपलब्ध होवू शकली नाही. तरी सभेच्या माहिती व मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.२२ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

निर्णय :– याबाबत चर्चा करण्यात आली. सद्यस्थितीत सदर ठिकाणी पाणी साचून असल्यामूळे काम करणे काही कालावधीसाठी शक्य नाही. पुढील कार्यवाहीच्या निर्णयाबाबत सर्व अधिकार मा. कुलगुरू महोदयांना देण्यात आले. तसेच Forest Academy, Chandrapur यांचेकडून सदर तलाव निर्मितीबाबत प्रस्ताव मागविण्याची सूचना करण्यात आली. सदर बाब माहिती व मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषद सभेकडे अग्रेषित करण्यात आली.

तरी सभेच्या माहिती व मान्यतेस्तव सादर.

निर्णय:– **डॉ. कृष्णकुमार पाण्डेय, संचालक, वारंगा परिसर, यांना वरील कार्य पूर्ण करण्याची जबाबदारी दिली गेली आहे. त्यांनी सदर कार्य लवकर कसे पूर्ण होईल यादृष्टीने आवश्यक प्रतिष्ठानांची चर्चा करून तथा आवश्यकतेनुसार मदत घेऊन कार्य करावे. सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १०.१३ **वास्तुविशारद यांची नोंदणी करण्याबाबत...**

विश्वविद्यालयाच्या रामटेक, वारंगा परिसर व नवीन उपकेंद्रे येथे विविध इमारत बांधकाम, अंतर्गत रस्ते बांधकाम, परिसर सुशोभिकरण (Lanscape), इमारत अंतर्गत सजावट, पाणी पुरवठा यंत्रणा, Rain water Harwesting & Strom Water Drainage, Play Ground इ. प्रकल्प प्रस्तावित आहेत. सदर प्रकल्पांकरिता वास्तुविशारदीय सेवा घेणे आवश्यक आहे. खालीलप्रमाणे प्रतिष्ठानांनी विश्वविद्यालयाच्या विकास कामाकरिता वास्तुविशारद सेवा (Architechrual Consultancy) घेण्याबाबत विनंती केलेली आहे. पत्र सोबत जोडलेले आहे.

Scanned with Oken Scanner

१. M.S. Shrivastav & Associates, D-204, Harsh Apartment, Dindayal Nagar, Nagpur- 440022 यांचे पत्र दि.२३/०७/२०२१

२. R.K. Associates, CS-1110, 4 th floor, Shahupuri, Kolhapur- 416001 यांचे पत्र दि.२३/०७/२०२१

सदर प्रतिष्ठानांना वास्तुविशारदीय कामे देण्यासाठी त्यांना विश्वविद्यालयाच्या वास्तुविशारद सुचीमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे.

तरी सभेच्या माहिती व मान्यतेस्तव सादर.

वास्तुरचना समिती सभा दि. २३/०७/२०२१ बाब क्र.२५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला.

निर्णय :– उपरोक्त दोन्ही वास्तुविशारद यांचे नाव वास्तुविशारद सूचीमध्ये समाविष्ट करण्याचे ठरले. रामटेक व वारंगा परिसरात खेळाचे मैदान व संबंधित भौतिक सुविधा, इमारत बांधकामाकरिता वास्तुविशारद M.S. Shrivastav & Associates, Nagpur यांचे नामनिर्देशन करण्यात आले. शुल्क निर्धारण व कामाचे स्वरूप निश्चितीचे अधिकार मा. कुलगुरू महोदयांना देण्यात आले. सभेने सदर बाब मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेकडे अग्रेषित केली.

तरी सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**निर्णय:–** **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १०.१४** **वारंगा परिसर, ना. सु. प्र. संकुल, नागपूर या परिसराचा करारानुसार इमारतीचे थकित भाडेबाबत.**

संदर्भ :– १. दि. २२/०६/२०२० रोजी झालेला करारनामा

२. विश्वविद्यालयाचे पत्र क्र.ककासंवि/२०२१/अभि./२९ दि.१७/०२/२०२१

३. विश्वविद्यालयाचे पत्र क्र.ककासंवि/२०२१/अभि./८९ दि.१२/०५/२०२१

विश्वविद्यालयाच्या ना. सु. प्र. संकुल, सीताबर्डी, नागपूर येथील ६ व्या माळयावरील खोली क्र. ६०६,६०७, ६०८, ६०९ व ६१० विद्यासेवा फाउंडेशन, नागपूर संस्थेला दि.०१/०७/२०२० पासुन दि. ३०/०६/२०२३ पर्यंत तीन वर्षासाठी देण्याबाबत विद्यासेवा फाउंडेशन, नागपूर यांच्याशी दि. २२/०६/२०२० रोजी करारनामा (Leave And License Agreement) करण्यात आलेला आहे. त्यानुसार विद्यासेवा फाउंडेशन, नागपूर संस्थेद्वारे दि. २२/०६/२०२० च्या करारातील अटी व शर्तीनुसार दि.०१/०७/२०२० पासून उपरोक्त नमूद जागेचा वापर करण्यात येत आहे. परंतु सदर संस्थेद्वारे माहे फेब्रुवारी–२०२१ ते जून–२०२१ पर्यंत एकूण पाच महिन्याचे दरमहा भाडे अद्याप भरणा करण्यात आलेले नाही व सदर संस्थेकडून इमारत भाडे भरणा करण्याबाबत व विद्युत सबमिटर लावण्यात आलेले नाही. याबाबत मा. कुलसचिव यांनी सभेचे आयोजन करण्याची सूचना केली. याबाबत दि.०९/०७/२०२१ रोजी सभा संपन्न झाली. सभेचा निर्णय खालीलप्रमाणे आहे.

**निर्णय** :– सभेत याबाबत संस्थेच्या पदाधिका–यांनी कोव्हिड–१९ च्या प्रादुर्भावामुळे प्रवेश क्षमता नसल्यामुळे दरमहा भाडे भरण्यास अडचण निर्माण होत असल्याने यात दिरंगाई झाली असल्याचे सांगीतले व या दरमहा भाडेमध्ये सूट मिळण्याबाबत विश्वविद्यालयास विनंती केली. याबाबत माहे फेब्रुवारी–२०२१ ते माहे जूलै–२०२१ असे दरमहा भाडे रू.५२,७५४/– प्रमाणे ०६ महिन्याचे भाडे मिळून एकुण रू. ३,१६,५२४/– होत आहे. त्यामुळे यातील ५०% रक्कम रू. १,५८,२६२/– येत्या ८ ते १० दिवसात विश्वविद्यालयाकडे जमा करण्याची व विद्युत सबमिटर तातडीने लावण्याची सूचना संस्थेला करण्यात आली. याबाबत संस्थेने सहमती दिर्शविली.

सदर संस्थेने दि. २२/०७/२०२१ रोजी थकित रक्कम रू. ३,१६,५२४/– पैकी रू.१,०५,५०८/– विश्वविद्यालयाकडे भरणा केलेले आहे.

Scanned with Oken Scanner

सदर संस्थेने पत्र दि. २४/०५/२०२१ अन्वये मार्च ते ऑगस्ट–२०२१ पर्यंत एकूण भाडे रक्कम रू. ३,१६,५२४/–यात ६० ते ७०% मासिक किरायामध्ये सूट म्हणजेच रू.२,२१,५६७/– देण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. मा. संचालक, वारंगा परिसर (डॉ. कृष्णकुमार पाण्डेय) यांनी मार्च, एप्रिल व मे–२०२१ मध्ये पूर्ण लॉकडाउन असल्याकारणाने केवळ या तीन महिन्याच्या किरायामध्ये रू. १,५८,२६२/– यात २५% सूट म्हणजेच रू. ३९,५६६/– देण्याची शिफारस केलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे सदर संस्थेने केलेली मागणी व त्यावर मा. संचालक, वारंगा परिसर यांनी केलेली शिफारस सभेच्या अवलोकनार्थ व किरायातील द्यावयाच्या सवलतीबाबत निर्णयार्थ सादर.

निर्णयः– **यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर संस्थेला ६० ते ७०% मासिक किरायामध्ये सूट देण्याची विनंती सभेने अमान्य केली. केवळ लॉकडाउन सुरू असलेल्या महिन्यात भाडे ५०% करण्यात यावे व इतर वेळेचे भाडे पूर्ण भरण्यास सांगावे. सदर प्रतिष्ठानाला इतक्या खोल्यांची गरज नसल्यास खोल्या कमी कराव्या. मा. संचालक, वारंगा परिसर (डॉ. कृष्णकुमार पाण्डेय) यांनी संस्थेशी चर्चा करावी व करारानुसार नियमितपणे भाडे अदा केल्यास संस्थेचा करार सुरू ठेवावा. असा निर्णय सभेने घेतला.**

<u>सामान्य प्रशासन विभागः– ११</u>

बाब क्र. ११.०१ **कोव्हीड – २०१९ पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्याबाबत...**

मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे पत्र क्र. बैठक/२०२१/प्र.क्र.१३७/विशि–३, दि. ३०.०६.२०२१ यांचे पत्र अवलोकनार्थ सोबत जोडले आहे.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांचे मा.कुलगुरू यांच्यासोबत मा. मंत्रीमहोदय, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८.०६.२०२१ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कोव्हिड–१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना विविध शुल्कांमध्ये सवलत देण्याविषयी विद्यापीठ स्तरावर निर्णय घेण्याबाबत सूचित करण्यात आले. त्यास अनुसरून प्रस्तुत विश्वविालयामध्ये झालेल्या बैठकी व यात झालेले निर्णय त्याचे इतिवृत्त सोबत जोडले आहे.

सदर इतिवृत्तातील बाब क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शुल्क माफ केल्यास एका वर्षात विश्वविद्यालय स्तरावर व महाविद्यालय स्तरावर माफ करावयाच्या शुल्काचा तपशील सोबत जोडला आहे.

संबंधित शुल्क अधिसूचनेची प्रत सोबत जोडली आहे. तरी या संदर्भात दिनांक ५ जुलै २०२१ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

निर्णयः– **सभेत याविषयी चर्चा झाली. समितीने दिलेल्या अहवालास सभेने मान्यता प्रदान केली व विश्वविद्यालयातील पारंपारीक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना मागीलवर्षी प्रमाणे १००% टक्के शुल्कमाफी करण्यात येईल व अपारंपारिक अभ्यासक्रमांना शिक्षण शुल्क वगळून ५०% टक्के शुल्क माफी लागू करण्यात आली आहे. विश्वविद्यालयातील संलग्नीत महाविद्यालयांसाठी शिक्षण शुल्क वगळून ज्या इतर शुल्क आकारणी केली जाते व ज्या सूविधांचा लाभ प्रत्यक्षपणे विद्यार्थ्यांनी उचलेला नाही. (जसे आविष्कार, स्पोर्टशुल्क, आंतरविद्यापीठ स्पर्धा इंद्रधुष्य, ग्रंथालयाचा वापर शुल्क यासारखे शुल्क) अश्या शुल्कांच्या नावांची स्पष्ट यादी तयार करून ते शुल्क माफ करण्यासंबंधी सर्व संलग्नीत/रिस अंतर्गत महाविद्यालये यासर्वांसाठी नोटिफीकेशन जारी करावे जेणे करून विश्वविद्यालयातील प्रत्येक छात्राला यामधे सूट प्राप्त होईल तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देशही विश्वविद्यालयरा लागू राहतील. सभेने यास मान्यता प्रदान केली.**

Scanned with Oken Scanner

**बाव क्र.११.०२ अकृषी विद्यापीठांमध्ये निवडणूक साक्षरता मंडळ अनिवार्यपणे स्थापन करण्याबाबत...**

मा. महामहीम राज्यपाल , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे पत्र क्र. बैठक/२०२१/प्र.क्र. १३७/विशि–३, दि. ३०.०६.२०२१ यांचे पत्र अवलोकनार्थ सोबत जोडले आहे.

विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही जागरुकता निर्माण करण्याच्या कार्याला गती येण्याकरिता महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयात आपल्या स्तरावर निवडणूक साक्षरता मंडळ अनिवार्यपणे स्थापन करावीत आणि तशी स्थापना झाल्याचे मुख्य निवडणूक आयोग यांना मेल करुन अवगत करावे असे संदर्भीय पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तसेच याअनुषंगाने निवडणूक आयोग कार्यालयाशी संपर्क केला असता यासंबंधीची नियमावली लवकरच शासनाच्या शिक्षण विभागाकडुन निर्गमित करण्यात येणार आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार २०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षात निवडणूक साक्षरता मंडळाद्वारे विद्यापीठ व महाविद्यालय येथे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे तरी यादृष्टीने विश्वविद्यालयात निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करण्याच्या मान्यतेस्तव सदर बाब व्यवस्थापन परिषद सभेत सादर करण्यात येत आहे.

(सहपत्र)

निर्णयः– **विश्वविद्यालयाचे संचालक, छात्र कल्याण (DSW) यांना यासाठी नोडल अधिकारी म्हणून नामनिर्देशित करण्यात यावे व शासन निर्णयानुसार निवडणूक साक्षरता मंडळाची स्थापना करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.**

<u>परीक्षा विभागः</u>– १२

**बाब क्र. १२.०१ हिवाळी परीक्षा –२०२०–२१ निकालाबाबत.**

विश्वविद्यालयाच्या हिवाळी–२०२० च्या परीक्षा मा. व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या निर्देशानुसार (Direction) परीक्षा ऑनलाईन /ऑफलाईन पद्धतीने संपन्न झाल्या. राज्यात व देशात कोविड–१९ विषाणुच्या प्रादूर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत महाविद्यालय बंद ठेवण्यात आले आहेत. प्रस्तुत विश्वविद्यालयाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र आहे. राज्यात कोविड–१९ विषाणूमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत, विश्वविद्यालयाने परीक्षांच्या आयोजनासाठी अवलंबलेल्या पद्धतीमुळे सर्व परीक्षा सुचारू पद्धतीने संपन्न झाल्या. मूल्यांकन कार्य त्या त्या महाविद्यालयात संपन्न झाले काही ठिकाणी शिक्षक उपलब्धते अभावी विश्वविद्यालयाने नेमून दिलेल्या महाविद्यालयात मूल्यांकन कार्य करण्यात आले. माहे एप्रिल २०२१ मध्ये राज्यात कोव्हिड चा मोठयाप्रमाणात प्रादुर्भाव झाल्यामुळे मूल्यांकन कार्य करण्यास बऱ्याच अडचणी होत्या त्यामुळे परीक्षांचे निकाल विहित कालावधीत घोषित करणे शक्य नसल्यामुळे मा. अधिष्ठाता मंडळ आणि मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार विहित कालावधी पेक्षा ३० दिवस अधिकचा कालावधी मान्य करण्यात आला. त्यामुळे आता सर्व निकाल घोषित करता आले आहेत. परीक्षांचे सुचारु पद्धतीने आयोजन व निकाल सर्वप्रथम प्रस्तुत विश्वविद्यालयाने जाहीर केले आहेत. सदर बाब कृतोत्तर मान्यतेस्तव दिनांक २४.०६.२०२१ रोजीच्या परीक्षा मंडळ सभेपुढे बाब क्र.५ अन्वये सादर करण्यात आली होती. सभेने खालीलप्रमाणे निर्णय दिला.

निर्णयः– विश्वविद्यालयाच्या सर्व परीक्षा शासकीय नियमानुसार सुचारू पद्धतीने संपन्न झाल्या. मुल्यांकन नवीन पद्धतीनुसार करण्यात आले असले तरी परीक्षांचे निकाल संपूर्ण महाराष्ट्रात कमीत–कमी वेळात घोषित करण्यात आले. याबाबत सभेने परीक्षा विभागाचे अभिनंदन केले. घोषित झालेल्या निकालास सभेने कृतोत्तर मान्यता प्रदान केली व सदर विषय मा. व्यवस्थापन परिषदेपुढे अग्रेषित करण्याची शिफारस केली.

त्यानुसार सदर बाब मा. व्यवस्थापन परिषदेपुढे कृतोत्तर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

Scanned with Oken Scanner

निर्णय:— सभेने यास मान्यता प्रदान केली.

बाब क्र. १२.०२ **हिवाळी परीक्षा—२०२०—२१ च्या विविध केंद्रावर झालेल्या परीक्षांचा सांख्यिकीय अहवाल व वापरण्यात येणाऱ्या उत्तरपत्रिकांचा अहवाल सभेच्या माहिती व मान्यतेकरिता सभेपुढे सादर करण्यात येत आहे.**

राज्यात व देशात कोविड—१९ विषाणुच्या प्रादूर्भावामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत महाविद्यालय बंद ठेवण्यात आले आहेत. मा. व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या निर्देशानुसार (Diretion) महाविद्यालयांमध्ये परीक्षा ऑनलाईन /ऑफलाईन पद्धतीने संपन्न झाल्या. ऑनलाईन परीक्षा ज्या ठिकाणी संपन्न झाल्या त्यांचे कडून विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या उत्तर पत्रिकांचा डाटा सीडी, डीव्हिडी, पेनड्राइव्ह स्वरुपात उपलब्ध झाला आहे. ज्या ठिकाणी शक्य होते त्या ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा आयोजित करण्यात आल्या अशा महाविद्यालयांना उत्तर पत्रिका विश्वविद्यालयातून वितरीत केल्या त्याबाबतचा विविध परीक्षा केंद्रांवर ग्रीष्म परीक्षा २०२० या परीक्षांचा सांख्यिकीय अहवाल व वापरण्यात येणाऱ्या उत्तरपत्रिका व उर्वरित उत्तरपत्रिका यांचा अहवाल सभेच्या माहिती व मान्यतेकरिता दिनांक २४.०६.२०२१ रोजीच्या परीक्षा मंडळ सभेपुढे बाब क्र.६ अन्वये सादर करण्यात आली होती. सभेने खालीलप्रमाणे निर्णय दिला.

निर्णय:— हिवाळी परीक्षा २०२०—२१ या परीक्षांचा सांख्यिकीय अहवाल व वापरण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांचा अहवाल यास सभेने मान्यता प्रदान केली व सदर विषय मा. व्यवस्थापन परिषदेपुढे अग्रेषित करण्याची शिफारस केली.

त्यानुसार सदर बाब मा. व्यवस्थापन परिषदेपुढे कृतोत्तर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

<u>नियोजन व विकास मंडळ</u> :— १३

बाब क्र. १३.०१ **शैक्षणिक सत्र २०२१—२२ करिता RISS अंतर्गत नवीन महाविद्यालय व अभ्यासक्रम सुरु करण्याच्या प्रक्रियेबाबत.**

विश्वविद्यालय कायदा ३३/१९९७ च्या कलम ६२(१) आणि RISS च्या Direction no. ११ of २०१९ अनुसार विशेषीकृत अभ्यासासाठी मान्यताप्राप्त परिसंस्था (RISS) अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२१—२२ करिता नवीन महाविद्यालय आणि अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी विविध संस्थांकडून ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव मागविण्याकरिता विश्वविद्यालयाच्या संकेतस्थळावर जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. ऑनलाईन पद्धतीने आवेदन करण्याची अंतिम तारीख दि. १५.०७.२०२१ ही होती. अंतिम तारखेपर्यंत एकूण ८० प्रस्ताव प्राप्त झाले आहे. ज्यामध्ये ३७ नवीन महाविद्यालयाचे प्रस्ताव व ४३ नूतनीकरण प्रस्तावांचा समावेश आहे. प्राप्त प्रस्तावांपैकी आवश्यक कार्यवाही उपरांत ३३ प्रस्तावांना RISS मान्यतेचे प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात आले आहे. उर्वरित प्रस्तावांबाबत नियोजन व विकास मंडळ विभागाद्वारे आवश्यक कार्यवाही सुरू आहे. ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं. सभेत माहितीस्तव सादर करण्यात आली होती. **नि.वि.मं. सभेचा निर्णय** : सभेने नोंद घेतली. आवेदन करण्याची अंतिम तारीख १५.०८.२०२१ पर्यंत वाढविण्याचे ठरले यानुसार सदर बाब सभेच्या माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र. १३.०२ **शैक्षणिक सत्र २०२१—२२ पासून नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, वाढीव तुकड्यांना शासनाद्वारे मंजूरी प्राप्त झाल्याबाबत.**

Scanned with Oken Scanner

विश्वविद्यालय कायदा ३३/१९९७ च्या कलम ६२(३) नुसार शैक्षणिक सत्र २०२१–२२ पासून नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय व वाढीव तुकड्यांना मंजूरी देण्याकरिता आवश्यक सर्व कार्यवाही उपरान्त पात्र २०५ प्रस्ताव शासनाकडे अग्रेषित केले होते. यापैकी शासनाने ७९ नवीन महाविद्यालय आणि २६ अभ्यासक्रम व तुकडी यांना मान्यता प्रदान केली आहे. ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं. सभेत मान्यतेस्तव सादर करण्यात आली होती. **नि.वि.मं. सभेचा निर्णय :** याबाबत सभेने विश्वविद्यालयाचे विशेष अभिनंदन केले. यास मान्यता प्रदान केली व ही बाब व्यवस्थापन परिषद व विद्वत् परिषदेच्या अंतिम मान्यतेसाठी अग्रेषित केली. सदर बाब सभेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

निर्णयः– **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १३.०३ **विश्वविद्यालयाच्या पुणे उपकेंद्रांबाबत.**

विश्वविद्यालयाद्वारे रत्नागिरी, पुणे, औरंगाबाद आणि नांदेड येथे उपकेंद्र स्थापन करण्याची मान्यता मिळण्याबाबत शासनाला प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्रा शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्र. उपकेंद्र–२०२१/प्र.क्र.३९/विशि–२, दि. १५.०३.२०२१ अन्वये अटी व शर्तींच्या अधीन राहून वरील शहरांमध्ये कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकचे उपपरिसर/उपकेंद्र विद्यापीठाच्या स्वनिधीतून स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार पुणे येथे उपकेंद्र स्थापन करण्यासाठी आवश्यक जमीन, इमारत आणि इतर बाबत कार्यवाही करण्यासाठी विश्वविद्यालयाद्वारे १) डॉ. ललिता चंद्रात्रे २) डॉ. रामचंद्र जोशी ३) श्री विजयेंद्र पांडे या त्रीसदस्यीय समितीचे गठण करण्यात आले होते. तहसिल कार्यालय हवेली, पुणे यांच्या दि. ३१.०५.२०२१ च्या प्राप्त पत्राच्या अनुषंगाने गठित समितीने तहसीलदार, हवेली तालुका यांच्याशी भेट घेऊन हवेली तालुक्यात उपलब्ध असलेली शासकीय जमिनीचा डाटा बँक प्राप्त केला. ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं. सभेत माहितीस्तव सादर करण्यात आली होती. **नि.वि.मं. सभेचा निर्णय :** सभेने नोंद घेतली.

सदर बाब सभेच्या माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

निर्णयः– **सभेने उपरोक्त माहितीची नोंद घेतली व या केंद्राला कार्यान्वीत करण्याच्या तसेच केंद्राकरीता जागा निवडीच्या दृष्टीने स्थानिक सल्लागार समिती स्थापन करण्याचे आदेश दिले.**

बाब क्र.१३.०४ **विश्वविद्यालयाच्या रत्नागिरी उपकेंद्रांबाबत.**

अ) विश्वविद्यालयाद्वारे रत्नागिरी, पुणे, औरंगाबाद आणि नांदेड येथे उपकेंद्र स्थापन करण्याची मान्यता मिळण्याबाबत शासनाला प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी पत्र क्र. उपकेंद्र–२०२१/प्र.क्र.३९/विशि–२, दि. १५.०३.२०२१ अन्वये अटी व शर्तींच्या अधीन राहून वरील शहरांमध्ये कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेकचे उपपरिसर / उपकेंद्र विद्यापीठाच्या स्वनिधीतून स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार रत्नागिरी उपकेंद्र स्थापन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासाठी विश्वविद्यालयाने १) डॉ. ललिता चंद्रात्रे २) डॉ. रामचंद्र जोशी ३) श्री विजयेंद्र पांडे या त्रीसदस्यीय समितीचे गठण केले. रत्नागिरी उपकेंद्रासाठी सामंजस्य करार करण्याबाबत पत्र प्राप्त झाले परंतु काही प्रशासकीय कारणास्तव सामंज्यस्य करार होऊ शकला नाही. या उपकेंद्रासाठी इमारतीचा ताबा घेतला असून येथे आवश्यक कार्यालयीन कार्य करण्यासाठी ०१ लिपिक आणि ०१ शिपाई यांची अनुक्रमे रू. ८०००/– व रू. ४०००/– दरमहा एकत्रित वेतनावर नियुक्त करण्यात आली. तसेच या उपकेंद्रासाठी आवश्यक फर्निचर सुद्धा खरेदी करण्यात आले. सबब केलेल्या कार्यवाहीला कृतोत्तर मान्यता मिळण्यासाठी ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं.

Scanned with Oken Scanner

सभेत सादर करण्यात आली होती. **नि.वि.मं. सभेचा निर्णय :**सभेने यास कृतोत्तर मान्यता प्रदान केली. तसेच सर्व उपपरिसर / उपकेंद्रात मुक्त व दूरस्थ शिक्षण (ODL) केन्द्र सुरू करावे, असे ठरले व ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव अग्रेषित करण्यात आली आहे.

**ब) विश्वविद्यालयांतर्गत रत्नागिरी उपकेंद्राच्या सूचारू संचालनासाठी समन्वयक, डॉ. दिनकर मराठे रत्नागिरी उपकेंद्र यांच्याकडून खालील बाबी ठेवण्यात येत आहे.**

रत्नागिरी उपकेंद्र संचालनासाठी खालील मुद्दे चर्चा व निर्णयार्थ सभेत प्रस्तुत करण्यात येत आहे.

१. विश्वविद्यालयाच्या रत्नागिरी उपकेंद्र स्थापनेचे परिपत्रक काढणे.
२. विश्वविद्यालयाच्या रत्नागिरी उपकेंद्राच्या संचालनासाठी संचालक नियुक्त करणे.
३. विश्वविद्यालय उपकेंद्र रत्नागिरी येथे दोन अतिथी गृहांसाठी इमारत भाडेतत्वावर घेण्याबाबत.
४. विश्वविद्यालय उपकेंद्र स्थापनेसाठी रत्नागिरी येथील प्राप्त इमारतीमध्ये आंतरिक सुव्यवस्था, फर्निचर , वर्गखोल्या, संगणक लॅब, इत्यादी व्यवस्था करण्याबाबत.
५. रत्नागिरी येथे वर्ष २०२१–२२ मध्ये सुरू करावयाचे अभ्यासक्रम व शुल्काबाबत.
रत्नागिरी उपकेंद्र येथे सत्र २०२१–२२ पासून खालील अभ्यासक्रम, **मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्र व शोध अध्ययन केंद्र** सुरू करणे प्रस्तावित आहे.
१) एम्. ए. (संस्कृत, योगशास्त्र, ज्योतिषशास्त्र) २) बी.सी.ए. ३) पदविका – संस्कृत, योग, वास्तुशास्त्र व मागणीनुसार इतर आधुनिक अभ्यासक्रम ६. रत्नागिरी उपकेंद्रामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत.
७. रत्नागिरी उपकेंद्रासाठी वर्ष २०२१–२२ साठी लागणाऱ्या अंदाजित खर्चाबाबत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन खर्च | – | रू. २०,००,०००/– |
| २. | आंतरिक व्यवस्थेसाठी खर्च ( Interior & Partition ) | – | रू. १५,००,०००/– |
| ३. | अतिथीगृह भाडे व आंतरिक सज्जता खर्च | – | रू. २,५०,०००/– |
| ४. | शैक्षणिक इमारतीत वीज, पाणी, सुरक्षा व स्वच्छता खर्च | – | रू. ५,००,०००/– |
| ५. | उपकेंद्र उद्घाटन व इतर आवश्यक व किरकोळ खर्च | – | रू. ७,५०,०००/– |
| | **एकूण अंदाजित खर्च** | – | **रू. ५०,००,०००/–** |

**क) रत्नागिरी उपकेंद्रासाठी २०५०० चौ. फुट जागेचे रजिस्टर्ड ॲग्रीमेंट करतांना भरावयाच्या रकमेबाबत.**

डॉ. जे. एन ठाकूर, प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी यांचे पत्र क्र. शाअमर/नवीन इमारत/२०२१/३७६, दि. २७.०७.२०२१ अन्वये शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी ने नोटराइज्ड कराराने दि. २४.०६.२०२१ रोजी जागा ताब्यात घेतली असून, त्यातील ८५०० चौ. फुट जागा विश्वविद्यालयास वापरासाठी दिलेली आहे.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे सदर जागेचे मुळ हक्क शासकीय अध्यापक महाविद्यालय, रत्नागिरी यांचेकडे राहणार असून सदर जागा कविकुलगुरू कलिदास संस्कृत विश्वविद्यालयास ३० वर्षासाठी नाममात्र भाडेकरारावर देण्यात येणार आहे. परंतू सदर जागा रजिस्टर्ड करण्यासाठी रू. १०००००/– इतकी अनामत रक्कम व रू. ३००००/– इतके नोंदणी शुल्क असे एकूण रू. १३००००/– (रू. एक लाख तीस हजार मात्र) इतकी रक्कम लागणार आहे. सदर तरतूद महाविद्यालयाला अंदाजपत्रकाद्वारे १३ कार्यालयीन खर्च या शीर्षाखाली उपलब्ध करून द्यावी अशी विनंती मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना करण्यात आलेली आहे.
तरतूद उपलब्ध होईपर्यंत लागणारी रक्कम रू. १३००००/– मा. कुलसचिव, कविकुलगुरू कलिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांनी तात्पुरत्या स्वरूपात भरण्याबाबत आदेशित

Scanned with Oken Scanner

करण्याबाबत मा. शिक्षण संचालकांना विनंती केलेली आहे. तसेच तरतूद उपलब्ध झाल्यानंतर ती रक्कम परत करण्याबाबत पत्रात नमूद केलेले आहे.

विश्वविद्यालयांतर्गत रत्नागिरी उपकेंद्राच्या **(अ)** मधे नमूद बाबी व्यवस्थापन परिषद सभेच्या कृतोत्तर मान्यतेसाठी तथा **(ब)** व **(क)** मधील नमूद बाबी मान्यता व पुढील निर्णयार्थ प्रस्तुत करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेत यासंदर्भात सविस्तर चर्चा झाली आणि याकरीता खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

अ) **नमूद बाबींची सभेने नोंद घेतली व रत्नागिरी उपकेंद्रात मुक्त व दूरस्थ शिक्षण (ODL) केन्द्र सुरू करण्यास सभेने मान्यता प्रदान केली.**

ब) **१. रत्नागिरी उपकेन्द्र स्थापनेसंबंधी अधिकृत परिपत्रक काढावे. (सा.प्र.)**

**२. रत्नागिरी उपकेन्द्र सुचारू पद्धतीने चालविण्याच्या दृष्टीने स्थानिक सल्लागार समिती (Local Advisory Committee) स्थापन करण्यात यावी.**

**३. उपकेन्द्राच्या संचालक पदांची नियुक्त करून त्यांचे वेतन, भत्ते निश्चित करावे व संचालक पद कार्यरत प्राध्यापकांमधून भरल्यास त्यांच्या बदली संबंधीची कार्यवाही आस्थापनेद्वारे करण्यात येईल आणि सदर कार्याकरीता अतिरिक्त भत्ते त्यांना लागू करण्यात यावे. याबाबत धोरण निश्चितीसाठी कुलसचिवांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समितीची स्थापना करण्यात यावी. (कुलसचिव— अध्यक्ष, वित्त व लेखा अधिकारी— सदस्य, संचालक, नियोजन विकास मंडळ— सदस्य)**

**४. अतिथीगृहाकरिता इमारत भाडेतत्त्वावर घ्यावी, इमारतीची आंतरिक व्यवस्था करणे, वित्तीय कार्याकरिता बॅंकेचे खाते उघडणे, व आवश्यकतेनुसार लागणाऱ्या सर्व बाबींना सभेने मान्यता प्रदान केली. तसेच**

**५. रत्नागिरी उपकेंद्रासाठी वर्ष २०२१—२२ साठी लागणाऱ्या अंदाजित रू. ५० लाख खर्चास सभेने मान्यता प्रदान केली.**

क) **रत्नागिरी उपकेन्द्रासाठी जागेचे Agreement करताना भरावयाच्या रू. १,३०,०००/— रकमेस तात्पुरत्या स्वरूपात अदा करण्यास सभेने मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १३.०५ RUSA द्वारे प्राप्त निधिबाबत.**

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) अंतर्गत विश्वविद्यालयाकरिता भौतिक सुविधासांठी रू. १५ कोटी निधी प्राप्त झाले आहे. या अनुदानातून विश्वविद्यालयामार्फत प्रत्यक्ष खर्च रू. १५,००,३१,१५१/— इतका करण्यात आला असून प्राप्त अनुदानापेक्षा रू. ३१,१५१/— इतका जादा खर्च झालेला आहे. RUSA चे पत्र दि. २८ जून २०२१ अन्वये सर्व लाभार्थ्यांनी भारतीय स्टेट बॅंकेत Zero Balance Subsidiary Account उघडणे बंधनकारक करण्यात आहे. तसेच प्राप्त निधितून दि. ३०.०६.२०२१ पर्यंत शिल्लक निधी व निधी वितरित करण्यात आलेल्या दिनांकापासून दि. ३०.०६.२०२१ पर्यंत सदर रकमेवर जमा झालेले एकत्रित व्याज संचालनालयाच्या बॅंक खात्यात जमा करण्याबाबत कळविलेले आहे. याअनुषंगाने

- भारतीय स्टेट बॅंकेत Zero Balance Subsidiary Account उघडण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत सुरू आहे.
- निधी प्राप्त झालेल्या दिनांकापासून दि. ३०.०६.२०२१ पर्यंत जमा झालेले व्याज (रू. ३७,७८,४००/—) संचालनालयाच्या बॅंक खात्यात जमा करण्याच्या निर्णयासाठी ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं. सभेत सादर करण्यात आली होती.

**नि.वि.मं. सभेचा निर्णय :** व्याजाची रक्कम रू. ३७,७८,४००/— संचालनालयाच्या बॅंक खात्यात

Scanned with Oken Scanner

वळती करण्यासाठी सभेने मान्यता प्रदान केली आणि ही बाब व्यवस्थापन परिषदेच्या अंतिम मान्यतेस्तव अग्रेषित करण्यात आली. सदर बाब सभेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

निर्णय:– सभेने यास मान्यता प्रदान केली.

बाब क्र. १३.०६ विश्वविद्यालयात नवीन विभागाच्या स्थापनेबाबत.

विश्वविद्यालयाचा शैक्षणिक विस्तार करण्याच्या दृष्टीने शैक्षणिक परिसर रामटेक येथे विविध विभाग स्थापित करण्याकरीता प्रस्ताव प्राप्त झाले आहे. ज्यामध्ये

1) Department of Yogic Science & Holistic Health (सहपत्र क्र. १)
2) Department of Sanskrit Prakarit & Pali (सहपत्र क्र. २)
3) Department of Vedic Sciences & Indic Studies (सहपत्र क्र. ३)
4) Department of Ancient Indian Architecture. (सहपत्र क्र. ४)
5) Vastu Research Centre (सहपत्र क्र. ५)

इत्यादिंचा समावेश आहे. ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं. सभेत माहीतीस्तव सादर करण्यात आली होती. नि.वि.मं. सभेचा निर्णय : निर्णय : वरीलपैकी अ.क्र. १ व ३ मान्य आणि अ.क्र. २ व ४ यांना खालील दुरूस्ती नंतर मान्यता प्रदान केली.

२) Department of Sanskrit Prakarit & Pali यातून Sanskrit वगळून Department of Pali & Prakarit असे राहील.

४) Department of Ancient Indian Architecture आणि Vastu Research Centre या दोन्ही प्रस्तावांचे एकत्रिकरण करणे.

या प्रस्तावांमध्ये आवश्यक बदल करण्यासाठी संबंधीत विभागांना पाठवावे.

सदर बाब सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

निर्णय:– सभेत याविषयी सविस्तर चर्चा झाली. त्याप्रमाणे खालील विभाग असावेत.

**1) Department of Yogic Science & Holistic Health**
**2) Department of Pali, Prakarit and other Indian languages**
**3) Department of Veda & Vedic Sciences - (Indic Studies चा स्वतंत्र अभ्यासक्रम विश्वविद्यालयामध्ये असल्याने यामधून Indic Studies हा भाग वगळण्यात यावा.)**
**4) Department of Ancient Indian Architecture & Vastu Research Centre**

**5) विश्वविद्यालयामध्ये सुरु असलेल्या Department of Veda & Vyakaran ऐवजी Department of Vyakaran असा नामोल्लेख करावा.**
**6) Department of Social Sciences याचे नामांतरण Department of Commerce & Management असे करावे.**

**संबंधित बाब विद्या विभागाकडे आवश्यक कार्यवाहीस्तव पाठवावी. वरील नमूद बदलांसह सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र.१३.०७ विश्वविद्यालयात डाटा सेंटर (Data Centre) स्थापित करण्याबाबत.

विश्वविद्यालयाच्या रामटेक परिसरात डाटा सेंटरची उभारणी करण्यासाठी केंद्र प्रमुख, संगणक व तांत्रिक केंद्राकडून नियोजन व विकास मंडळ विभागाला प्रस्ताव प्राप्त झाला आहे. या डाटा सेंटरच्या माध्यमातून विश्वविद्यालयातील परीक्षांसंबंधी, संलग्नीकरण इत्यादी महत्वाची कामे पार पाडण्यात येतील. सद्यस्थितीत विद्यापीठाचे स्वत:चे डाटा सेंटर अस्तित्वात नसल्यामुळे ही कामे

Scanned with Oken Scanner

बाह्य यंत्रणेद्वारे करण्यात येतात. विश्वविद्यालयात डाटा सेंटर तयार करण्यासाठी रू. ७.५० कोटी खर्च अपेक्षीत आहे. त्यामुळे डाटा सेंटर ला आवश्यक आर्थिक सहाय्य शासनाकडून प्राप्त होण्याच्या दृष्टीने विभागाला प्राप्त प्रस्ताव शासनाला पाठविण्याची मान्यता मिळण्याकरिता ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं. सभेत सादर करण्यात आली होती. **नि.वि.मं. सभेचा निर्णय :** सभेने यास मान्यता प्रदान केली व ही बाब अंतिम मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेकडे अग्रेषित केली. सदर बाब सभेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १३.०८ **विविध संस्थांद्वारे प्राप्त कौशल्य विकास संबंधी नवीन अभ्यासक्रम विश्वविद्यालयामार्फत चालविण्याबाबत.**

विविध संस्थांद्वारे कौशल्य विकास संबंधी व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयामार्फत RISS अंतर्गत चालविण्याची मान्यता मिळण्याबाबत ५२ प्रतिष्ठानांकडून प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. या अभ्यासक्रमांमध्ये Media / Travel & Tourism / Sports / Event Management / Commerce & Business Administration / Computer Science / Visual Arts / Performing Arts इत्यादींचा समावेश आहे. यासंदर्भात दि. २३. १२. २०२० रोजी संपन्न झालेल्या नियोजन व विकास मंडळ सभेतील निर्णयानुसार अभ्यासक्रमांबाबत विद्या विभागामार्फत कार्यवाही सुरू आहे. केंद्र शासनाच्या New Education Policy अंतर्गत सुद्धा कौशल्य विकास संबंधी अभ्यासक्रम विद्यापीठामार्फत राबविण्याकरिता सूचना प्राप्त आहे. ही बाब दि. १९.०७.२०२१ च्या नि.वि.मं. सभेत निर्णयास्तव सादर करण्यात आली होती. **नि.वि.मं. सभेचा निर्णय :** याबाबत सभेत विस्तृत चर्चा झाली. अशा विशेष कौशल्य विकास संबंधी अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालयात विशेष सोई सुविधा आणि प्राध्यापक यांची आवश्यकता असते. त्यामुळे अशा अभ्यासक्रमांना सर्व महाविद्यालयात सुरू करणे संयुक्तिक होणार नाही. याकरिता ज्या संस्थेत या अभ्यासक्रमासाठी सर्व तांत्रिक सोई सुविधा आणि प्राध्यापक उपलब्ध असतील अशा महाविद्यालयाचे आवेदन प्राप्त झाल्यास फक्त त्या—त्या महाविद्यालयाला अशा प्रकारचे अभ्यासक्रम सूरू करण्याकरिता Direction तयार करावे, असे ठरले. ही बाब विद्वत् परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी अग्रेषित करण्यात आली.

सदर बाब सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

निर्णय:— **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

<u>पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग:</u>— १५

मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्र

बाब क्र.१५.०१ **क.का.सं.वि. च्या मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्रा अंतर्गत चालविण्यात येणा—या अभ्यासक्रमाच्या LMS (Learning Management system) पद्धतीने सुरू करण्याकरिता MKCL सोबत करारनामा (MOU ) करण्याबाबत.**

क.का.सं.वि च्या मुक्त व दूरस्थ शिक्षण केन्द्राद्वारा पद्व्युत्तर पदवी, पदवी पदविका व प्रमाणपत्र स्तरावर विविध अभ्यासक्रम चालविण्यात येत आहे. प्राथमिक स्वरूपात पदविका तथा प्रमाणपत्र हे अभ्यासक्रम MKCL च्या ERA अंतर्गत Learning Management system (LMS) माध्यमात Online पद्धतीने चालविण्यात येत आहे. तसेच हळू हळू सर्व अभ्यासक्रम LMS माध्यमात online पद्धतीने चालवायचे आहे. याकरिता MKCL कडून प्रस्ताव (proposal) मागविण्यात आला होता. त्यांनी प्रस्ताव (Proposal) सादर केले आहे. या प्रस्तावामध्ये त्यांनी Learning Management system + Term End online Examination system करिता प्रती **विद्यार्थी,**

Scanned with Oken Scanner

प्रति शैक्षणिक वर्ष करिता रु. 200 + 18 % GST नमूद केलेली आहे. तसेच तीन वर्षानंतर ह्या शुल्कामध्ये 10% वाढ होइल असे सांगितले आहे.

सध्या मुक्त व दूरस्थ शिक्षण केंद्रामध्ये विविध अभ्यासक्रमात 475 विद्यार्थी आहेत. पुढील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी संख्या 1200 होईल. तरी LMS करिता प्रति विद्यार्थी 236 (GST) सह X 1200 विद्यार्थी = 2,83,200/- खर्च लागेल.

तरी सदर बाब मार्गदर्शनार्थ व मान्यतेस्तव सभेच्या पुढे ठेवण्यात येत आहे.

निर्णय:— **या संदर्भात MKCL सोबत करार (MOU) पुढे वाढविण्यात यावा व प्रति विद्यार्थी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यात यावे. पदव्युत्तर पदवी पदविका — रू. २००/—, पदवी — रू. १५०/— पदविका — रू. १००/— व प्रमाणपत्र —रू. ५०/— याबाबत समन्वयकांनी MKCL शी बोलून समन्वय साधावा असा सभेने निर्णय दिला व यास सभेने मान्यता प्रदान केली.**

**बाब क्र. १५.०२ प.पू. श्री. गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर, रामटेक येथे शैक्षणिक सत्र २०२१—२२ साठी खालीलप्रमाणे विभागनिहाय सावधिक प्राध्यापकांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. आवश्यक अर्हतेसह इतर तपशिल खालीलप्रमाणे —**

| क्र | विभागाचे नाव | सावधिक प्राध्यापकांची संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| ०१ | आधुनिक भाषा विभाग | इंग्रजी — ०१<br>मराठी — ०१<br>हिंदी — ०१ | Good academic record as defined by the concerned university with at least 55% marks (or an equivalent grade in a point scale wherever grading system is followed) at the Master's Degree level in a relevant subject from an Indian University, or an equivalent degree from an accredited foreign university. Besides fulfilling the above qualifications, the candidate must have cleared the National Eligibility Test (NET) conducted by the UGC, CSIR or similar test accredited by the UGC like SLET/SET. iii. Notwithstanding anything contained in sub-clauses (i) and (ii) to this Clause 4.4.1, candidates, who are, or have been awarded a Ph. D. Degree in accordance with the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of Ph.D. Degree) Regulations, 2009, shall be exempted from the requirement of the minimum eligibility condition of NET/SLET/SET for recruitment |
| ०२ | भारतीय दर्शन विभाग | ०३ | |
| ०३ | योगविज्ञान विभाग | ०२ — रामटेक<br>०२ — वारंगा | |
| ०४ | संस्कृत भाषा व साहित्य विभाग | ०१— रामटेक<br>०१ — वारंगा | |
| ०५ | वेदांग ज्योतिष विभाग | ०२ — रामटेक<br>०२ — वारंगा | |
| ०६ | व्याकरण विभाग | ०१ | |
| ०७ | वेद विभाग | ०२ (१ ऋग्वेदी १ कर्मकाण्ड) | |
| ०८ | संगणक विज्ञान विभाग | ०४ | |
| ०९ | लोकप्रशासन विभाग | ०३ | |
| १० | शिक्षणशास्त्र विभाग | ०३ | |
| ११ | Dept. of Commerce & Management पूर्वीचा सामाजिक विज्ञान विभाग) | ०२— बी.बी.ए<br>०२— बी.कॉम | |
| १२ | शारीरिक शिक्षण विभाग | ०१ | Consistently Good Academic record with a Master's Degree in Physical Education and Sports or Physical Education or Sports Science with 55% marks (or an equivalent grade in a point-scale, wherever the Grading System is followed)<br><br>Record of having represented the university / college at the inter- university /inter-collegiate competitions or the State and/ or national championships. |

Scanned with Oken Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | Besides fulfilling the above qualifications, the candidate must have cleared the National Eligibility Test (NET), conducted by the UGC or CSIR, or a similar test accredited by the UGC, like SLET/SET, or who are or have been awarded a Ph.D. Degree in Physical Education or Physical Education and Sports or Sports Science, in accordance with the University Grants Commission (Minimum Standards and Procedure for Award of M.Phil./Ph.D. Degree) Regulations, 2009 or 2016 and their amendments from time to time. |
| | एकूण | ३४ | |

तरी दिनांक २०.०७.२०२१ रोजी मा. अधिष्ठाता मंडळ सभेत मान्य करण्यात आल्यानुसार सहाय्यक प्राध्यापक/अधिव्याख्याता या पदांसाठी जाहिरात प्रकाशित करण्यात यावी. सहाय्यक प्राध्यापकांसाठी निश्चित वेतन २५००० + १० टक्के घरभाडे भत्ता तर अधिव्याख्यात्यांसाठी एकत्रित वेतन रू. १५०००/— असावे. शैक्षणिक सत्र २०२१—२२ करीता विविध विभागातील सावधिक प्राध्यापकांची नियुक्ती करण्याच्या निर्णयार्थ सदर बाब सादर.

निर्णयः— **सभेने शैक्षणिक सत्र २०२१—२२ करीता उपरोक्त विवरणानुसार व सहाव्या वेतन आयोगावर आधारित वेतन निश्चिती करून सावधिक सहाय्यक प्राध्यापक/अधिव्याख्याता या पदांच्या नियुक्तीस मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १५.०३ **प.पू.गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर रामटेक "गुरुकुलम्" करिता कनिष्ठ लिपिक, शिपाई व अतिथीगृह परिचारक यांच्या नियुक्तीबाबत.**

प.पू. श्री. गोळवलकर गुरुजी शैक्षणिक परिसर रामटेक चे कार्य सुचारू रुपात चालविण्याकरिता कायमस्वरूपी कनिष्ठ लिपिक, शिपाई व अतिथीगृह परिचारक यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत गुरुकुलम् च्या आस्थापनेवर ०८ शिक्षकांची पदे मान्य आहेत. याच धर्तीवर ०१ कनिष्ठ लिपिक , ०१ शिपाई व ०१ अतिथीगृह परिचालक ही शिक्षकेतर पदे मान्य करण्यात यावी. ही पदे मान्य करावयाच्या निर्णयार्थ सदर बाब सादर करण्यात आली आहे.

निर्णयः— **"गुरुकुलम्" च्या प्राध्यापक/अधिव्याख्याता यांच्या सावधिक नियुक्ती करण्यात येत आहेत. याच धर्तीवर कनिष्ठ लिपिक, शिपाई व अतिथीगृह परिचारक यांच्या नियुक्ती झाल्यास "गुरुकुलम्" सुयोग्य पद्धतीने कार्यान्वित होईल असे नमूद करीत सभेने उपरोक्त पदांच्या सावधिक नियुक्तीसाठी मान्यता प्रदान केली.**

**महाविद्यालयीन शाखाः— १७**

बाब क्र. १७.०१ **दमयंतीताई देशमुख बी. एड. कॉलेज, रामटेक यांनी शैक्षणिक सत्र २००३—०४ मध्ये भरलेले शुल्क परत मिळावे म्हणून केलेल्या अर्जाबाबत.**

प्रस्तुत विश्वविद्यालयाच्या विद्वंत् परिषद सभा दि. २४.०४.२००३ बाब क्र. ४४ अन्वये प्रस्ताावित आणि व्यवस्थापन परिषद सभा दि. २५.०४.२००३ बाब क्र. २४ अन्वये पारित निर्णयास अनुसरून दि. ०४ नोव्हेंबर २००३ रोजी जा. क्र. १२३१ अन्वये शिक्षाशास्त्री (बी.एड) छात्रप्रवेश नियमावली प्रसिद्ध करण्यात आली. त्यातील नियम क्र. १० प्रवेशाची यादी विश्वविद्यालयाकडून मान्य झाल्यावर आपल्या संस्थेने विश्वविद्यालयाला प्रवेशित प्रति छात्र आकारलेल्या संपूर्ण प्रवेश

Scanned with Oken Scanner

शुल्काच्या २०% रक्कम विश्वविद्यालयास देणे बंधनकारक आहे. यानुसार संबंधित महाविद्यालयांनी कार्यवाही करणे अपेक्षित होते. त्यानुसार दमयंतीताई देशमुख बी. एड. कॉलेज, रामटेक यांनी शै. सत्र २००३–०४ मध्ये प्रवेश शुल्क प्रति विद्यार्थी रक्कम रू. २९,९००/– च्या २०% रक्कम रू. ५,९८०/–याप्रमाणे एकूण प्रवेशित ९८ विद्यार्थ्यांची रू. ५,८६,०४०/– इतकी रक्कम पावती क्र. १२१८१ दि. १९.०१.२००४ अन्वये विश्वविद्यालयात जमा केली. परंतु, सदर शुल्क स्विकारताना महाविद्यालयाची दिशाभूल करण्यात आली असून महाविद्यालयाद्वारे जमा करण्यात आलेली रक्कम रू. ५,८६,०४०/– परत मिळावी,यासाठी संबंधित महाविद्यालयाने पत्रव्यवहार केलेला आहे. विश्वविद्यालयाद्वारे आकारण्यात आलेले शुल्क तत्कालीन निर्णयानुसार योग्य असल्याचे संबंधितांना कळविण्यात आले. तथापि, संस्थेचे अध्यक्ष यांनी सदर रक्कम परत मिळण्यासाठी वारंवार केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने याबाबत प्रत्यक्ष सुनावणीचे आयोजन करण्यात आले. सुनावणी दरम्यान संस्थेचे अध्यक्ष आणि महाविद्यालय विभागाचे सहायक कुलसचिव यांनी आपली बाजू मा. कुलसचिव यांच्यानुसार मांडली. सदर सुनावणीचा अहवाल सादर करण्यात येत असून त्यानुसार पूर्वी याबाबतचा निर्णय मा. व्यवस्थापन परिषदेने घेतला असल्याने याबाबत अंतिम निर्णयार्थ सदर बाब सभेपुढे ठेवण्यात येत आहे.

निर्णयः– **सभेने सदर बाब आवश्यक कागदपत्रांअभावी निर्णय घेणे शक्य नसल्याने सर्व आवश्यक कागदपत्रासह सदर बाब पुढील सभेत पुनःश्च सादर करावी असे सभेने सांगितले.**

## पुरवणी विषयसूची

नियोजन व विकास मंडळ :– १३

बाब क्र. १३.०९ **योग विज्ञान विभागात नविन अध्यापकाचे पद निर्माण करण्याबाबत.**

प. पू. गोळवलकर गुरूजी गुरूकुलम, रामटेक येथील विद्यार्थ्यांना योग प्रशिक्षण देण्यासाठी एक अध्यापकाचे पद निर्माण करण्यासाठीचा प्रस्ताव योग विभागाद्वारे तयार करण्यात आला आहे. एका अध्यापकाची नियुक्ती केल्यावर त्यासाठी येणारा वेतनाचा वार्षिक खर्च रू. ५,१८,४००/– इतका राहील. करिता एक अध्यापकाची नियुक्ती करणे आणि वेतनाच्या वार्षिक खर्चाला मान्यता मिळण्यासाठी सदर बाब सभेपुढे सादर करण्यात आली.

निर्णयः– **प.पू. गोळवलकर गुरूजी गुरूकुलम् च्या आस्थापनेवर आठ सहायक प्राध्यापकांची पदे मंजूर करण्यात आली आहे. विश्वविद्यालयात गुरूकुलम् आस्थापनेवर संगणक विज्ञान विभाग असल्याने संगणक विज्ञान या विषयाचे पद योग विषयासाठी मंजूर करण्यात यावे असा सभेने निर्णय घेतला.**

बाब क्र. १३.१० **राष्ट्रीय संस्कृत संस्थान नवी दिल्ली यांच्या कडुन मान्य Dictionary of technical term of Vedic astrology या प्रकल्पाबाबत.**

Dictionary of technical term of vedic astrology प्रकल्पाकरीता राष्ट्रीय संस्कृत संस्थान नवी दिल्ली यांच्या कडून सदर प्रकल्पाकरिता रू ३,००,०००/– (तीन लक्ष )अनुदान मान्य झाले. मान्य अनुदानातून ५०% रक्कम रू १,५०,०००/– (एक लक्ष पन्नास हजार) विश्वविद्यालयास प्राप्त झाली. प्राप्त अनुदानाच्या रकमेतून रू १,६०,०००/– (एक लक्ष साठ हजार) इतका खर्च सदर प्रकल्पाअंतर्गत करण्यात आला. आणि या रकमेचे Utilization Certificate सुध्दा तयार करून संस्थेला पाठविण्यात आलेले आहे.

तसेच CSU/Ashtaadashi-1/2017-18/29/80 dated 26-02-2021 या पत्राद्वारे राष्ट्रीय संस्कृतसंस्थेकडून प्रकल्पाकरीता उर्वरित ५०% अनुदानातून ४०% रक्कम म्हणजे रू १,२०,०००/– (एक लक्ष वीस हजार )मंजूर करण्यात आले. परंतू अनुदान प्राप्त झाले नाही.

Scanned with Oken Scanner

(पत्र संलग्नित) संस्थाकडून मान्य अनुदानातून (४०%) सदर प्रकल्पासाठी रक्कम रू १,२०,०००/–) रू ७०,४२५, ८०,००० व १,५०,४२५/– (एक लक्ष पन्नास हजार चारशे पंचवीस) खर्च करण्यात आले. उपरोक्त विवरणा प्रमाणे रू ३,१०,४२५/– चा खर्च कृत्तोतर मान्यतेस्तव सादर करण्यात आली.

निर्णयः– **यासंदर्भात तूर्तास विश्वविद्यालयाने रू. ३,१०,४२५/– हा खर्च करून कार्यपूर्ती करावी. कार्यपूर्तीनंतर शासनाकडून उर्वरित रक्कम प्राप्त होणार आहे अशी माहिती संचालक, नियोजन विकास मंडळ यांनी माहिती दिली. सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र.१३.११ **Research Resource Centre (RRC) च्या निकष (Direction) बाबत.**

विश्वविद्यालयाकडे समर्थ वाग्देवता मंदीर धुळे यांचे मार्फत संशोधन स्त्रोत केंद्राकरिता मागणी करण्यात आली होती.सदर ठिकाणी उपलब्ध हस्तलिखितांची संख्या, विषय लक्षात घेता सदर हस्तलिखित संस्कृत व संस्कृत भाषेशी संबंधीत विषयाशी असल्याने संस्कृत भाषेत संशोधन करणा–या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल. करीता विश्वविद्यालयाचे संशोधन स्त्रोत केंद्र म्हणून मान्यता देण्याबाबत निकष तयार करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यानुषंगाने समितीचे गठण करण्यात येऊन संशोधन स्त्रोत केंद्राकरिता निकष तसेच आवेदन पत्र तयार करण्यात आले असून त्यास १४/७ अंतर्गत मान्यता प्राप्त आहे. तरी सदर बाब सभेच्या माहीती व कृतोत्तर मान्यतेकरिता सादर करण्यात आली.

निर्णयः– **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

<u>पद्व्युत्तर शैक्षणिक विभागः</u>– १५

संचालक, **Outreach Program**

बाब क्र. १५.०४ **विश्वविद्यालयातील स्पर्धा परीक्षेसाठी तयार करण्यात आलेले वाचन कक्षाचा वापर कोरोना काळात आपले पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांसाठी निःशुल्क उपलब्ध करण्याबाबत.**

उपरोक्त विषयान्वये ज्या विद्यार्थ्यांनी कोरोना काळात आपले पालक गमावलले आहेत. त्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी तयार केलेला वाचन कक्ष निःशुल्क वापर करू देण्यात यावा. यासाठी सभेच्या मान्यतेस्तव सदर बाब प्रस्तुत करण्यात आली.

निर्णयः– **यास सभेने मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १५.०५ **कोरोनामुळे अनाथ झालेल्या महिला, मुले यांच्यासाठी विविध कौशल्य विकास प्रशिक्षण उपकेंद्रावर घेण्यासाठी ३ लाखाचा निधी राखून ठेवणेबाबत...**

उपरोक्त विषयान्वये कोरोनामुळे झालेली भीषण परिस्थितीत अनेक महिला व मुले निराधार झालेली आहेत. अशा परिस्थितीत सामाजिक दायित्व म्हणून विश्वविद्यालयातील रामटेक व वारंगा, नागपूर व रत्नागिरी, पुणे, नांदेड, औरंगाबाद अशी नव्याने उपकेंद्र घोषित झालेल्या परिसरामध्ये विकास प्रशिक्षण घेण्यासाठी प्रत्येकी ५०,०००/– याप्रमाणे एकुण ३,००,०००/– तीन लाखाचा निधी राखून ठेवण्यात यावा तसेच या सहा ठिकाणी महिलांसाठी व मुलांसाठी इच्छेनुसार १) फॅशन डिझायनिंग २) मेंहदी प्रशिक्षण ३) पाककला प्रशिक्षण ४) संगणक/ मोबाईल दुरूस्ती प्रशिक्षण ५) Social Media Training ६) 3 Months Certificate Course for Hospitality Studies असे Training Program मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने वेळोवेळी घेण्यात यावे. तरी सदर बाब पुढील मान्यतेकरीता सभेपुढे सादर करण्यात आली.

Scanned with Oken Scanner

निर्णयः— **सभेने शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ च्या अंदाजपत्रकात याचे प्रावधान असल्यास प्रत्यक्षपणे विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याच्या अटीवर यास मान्यता देण्यात आली.**

बाब क्र १५.०६ **छात्र कल्याण विभागाची उद्‌दिष्टे निश्चित करण्याबाबत.**

विश्वविद्यालयाच्या अधिनियम १९९७ प्रकरण सात मधील प्रावधानानूसार विश्वविद्यालयाची छात्र कल्याण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीची सभा दिनांक ०८ जून, २०२१ रोजी नुकतीच संपन्न झाली. यापूर्वी छात्र कल्याण समितीचे उद्‌दिष्टे निश्चित नसल्यामुळे समितीद्वारे आता उद्‌दिष्टे निश्चित करण्यात आले असून सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आले आहे. तरी उपरोक्त सदर दहा उद्‌दिष्टे व्यवस्थापन परिषद सभेच्या माहिती व मान्यतेस्तव प्रस्तुत करण्यात आली.

निर्णयः— **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र १५.०७ **छात्र कल्याण विभागाच्या संचालकांचे अधिकार व कर्तव्य निश्चित करण्याबाबत.**

विश्वविद्यालयाच्या अधिनियम १९९७ प्रकरण ३/२२ मधील प्रावधानानूसार छात्र कल्याण संचालक यांचे नामनिर्देशन करण्यात येते. या संदर्भात छात्र कल्याण समितीची सभा दिनांक ०८ जून, २०२१ रोजी संपन्न झाली. छात्र कल्याण संचालकांचे अधिकार व कर्तव्य निश्चित नसल्यामुळे आता ते निश्चित करण्यात आले आहे. तरी उपरोक्त संचालक, छात्र कल्याण यांचे चौदा अधिकार व कर्तव्य व्यवस्थापन परिषद सभेच्या माहिती व मान्यतेस्तव प्रस्तुत करण्यात आली.

निर्णयः— **सभेने याची नोंद घेतली.**

बाब क्र. १५.८ **सत्र २०१८–१९ चा वार्षिक अहवाल मान्यतेबाबत.**

विश्वविद्यालय कायदा १९९७ कलम ८३ अन्वये विद्यापीठाचा वार्षिक अहवाल तयार करणे व प्रसिद्ध करण्याबाबत नमूद केलेले असून त्याप्रमाणे दरवर्षी विश्वविद्यालयाच्या झालेल्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तयार करण्यात येतो, सदर तयार करण्यात आलेल्या अहवालाला व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन मा. कुलाधिपती व राज्य शासन यांना सादर करावयाचा असतो.

त्याअनुषंगाने सत्र २०१८–१९ चा वार्षिक अहवाल तयार करण्यात आला असून, मान्यतेस्तव व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात आली.

निर्णयः— **सभेने यास मान्यता प्रदान केली.**

बाब क्र. १५.९ **कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात ज्ञानयोगी श्रीकांत जिचकार ज्ञानस्रोत केंद्रात तयार करण्यात आलेले योग तथा नॅचरोपॅथी चिकित्सा केंद्र सुरु करण्याबाबत. योगविज्ञान विभाग**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात योगविज्ञान विभागाद्वारे ज्ञानयोगी श्रीकांत जिचकार ज्ञानस्रोत केंद्र येथे योग तथा निसर्गोपचार चिकित्सा केंद्र तयार करण्यात आले आहे . या केंद्राचे संचालन कसे करावे याबाबत ही बाब अधिष्ठाता मंडळाची सभा दिनांक २० जुलै २०२१ बाब क्रमांक ११ अन्वये सादर करण्यात आली होती. योग निसर्गोपचार चिकित्सा केंद्राचा सविस्तर अहवाल क्र. १ आणि २ अन्वये सोबत जोडण्यात आला आहे.

तरी अधिष्ठाता मंडळ सभेच्या निर्णयानुसार कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयात ज्ञानयोगी श्रीकांत जिचकार ज्ञानस्रोत केंद्रात तयार करण्यात आलेले योग तथा नॅचरोपॅथी चिकित्सा केंद्र सुरु करण्याच्या मान्यतेस्तव तथा मार्गदर्शनार्थ व्यवस्थापन परिषदेच्या सभेत सादर करण्यात आले.

Scanned with Oken Scanner

निर्णय:— योग तथा निसर्गोपचार चिकित्सा केंद्रावर योग शिक्षक नियुक्तीचे अधिकार मा. कुलगुरू महोदय यांना प्रदान करण्यात आले. व्हॅक्सीनेशन झालेल्या विद्यार्थ्यांना कोव्हीड नियमावलीचे पालन करित अभ्यासक्रम करण्यास सभेने मान्यता प्रदान केली.

बाब क्र. १५.१० **शैक्षणिक सत्र २०२०—२१ मध्ये विश्वविद्यालयाद्वारे सुरू करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती योजनेच्या रकमेत ५०% कपात करण्याबाबत.**

व्यवस्थापन परिषद सभा दि. ०१/२०१९—२०, दि. ०८.०८.२०१९ अन्वये निर्गमित परिपत्रक क्र. ककासंवि/सा.प्र./२०१९/९०१, दि. २४.०९.२०१९ च्या अनुषंगाने विश्वविद्यालयातील प. पू. गोळवलकर गुरूजी शैक्षणिक परिसर रामटेक येथे प्राकशास्त्री, शास्त्री, आचार्य, एम.फिल अभ्यासक्रमात गुरूकुल पद्धतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण व्हावी व संस्कृत भाषा अवगत करणारे विद्यार्थी वाढावे या हेतुने शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे. परंतू मागील एक ते दिड वर्षापासून कोरोना प्रादुर्भावामुळे शासनाच्या आदेशाने विश्वविद्यालयात विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर बंदी असून विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने सुरू आहे. तसेच कोरोना परिस्थितीमुळे पारंपारिक गुरूकुल पद्धतीने चालविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व इतर शुल्क यामध्ये १००% सवलत देण्यात आलेली आहे. या सर्व अभ्यासक्रमाचे अध्ययन—अध्यापन ऑनलाईन पद्धतीने झाले असल्यामुळे विद्यार्थ्यांना राहण्याचा, खाण्याचा व इतर खर्च लागलेला नाही. त्याअनुषंगाने सत्र २०२०—२१ मध्ये वरील परिपत्रकाच्या अनुषंगाने विश्वविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना जाहीर केलेल्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत ५०% कपात करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. याबाबत पुढील निर्णयार्थ सदर बाब व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात आले.

निर्णय:— **सभेने शिष्यवृत्ती संबंधित प्रस्तावित कपातीला मान्यता प्रदान केली.**

## <u>वेळेवर ठेवण्यात आलेल्या बाबी</u>

सामान्य प्रशासन विभाग :— ११

बाब क्र. ११.०३ **विश्वविद्यालयातील सर्व संचालित व संलग्नित महाविद्यालये व वसतिगृह माहे सप्टेंबर—२०२१ पासून प्रत्यक्ष पद्धतीने सुरु करण्याबाबत.**

**संदर्भ — UGC Guideline on examination and academic calender in view of the COVID-19 Pandemic- July 2021**

राज्यात कोरोना विषाणूचा (कोव्हिड—१९) वाढत असलेला प्रार्दुभाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनेच्या अनुषंगाने विश्वविद्यालयाच्या संचालित व संलग्नित महाविद्यालयात ऑनलाईन पध्दतीने अध्यापन व अध्ययन work from home याप्रमाणे सुरु ठेवण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांचे वसतिगृह तात्पुरते स्वरुपात बंद करण्यात आले आहे.

संदर्भीय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिशानिर्देशानुसार, आगामी शैक्षणिक सत्राकरिताचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. या अनुषंगाने कोव्हीड मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंत पालन करीत विश्वविद्यालयातील संचालित व संलग्नित महाविद्यालये तसेच वसतिगृह प्रत्यक्ष पद्धतीने सुरू करण्याच्या मान्यता व निर्णयार्थ सदर बाब व्यवस्थापन परिषद सभेत सादर करण्यात आली.

निर्णय:— **यास सभेने मान्यता प्रदान केली.**

<u>वित्त व लेखा विभाग</u>:— ८

बाब क्र. ८.१४ **विश्वविद्यालयातील विविध विभागांच्या कामाकाजाच्या दृष्टीने संगणकीय Software गरजेस अनुसरुन तयार करुन घेणेबाबत...**

Scanned with Oken Scanner

प्रस्तुत विश्वविद्यालयाच्या विविध प्रशासकीय आणि शैक्षणिक कार्याच्या दृष्टीने विभागांचे कामकाज लक्षात घेउन पूर्ण स्वरुपात संगणकीकरण करण्याबाबत मा. कुलगुरु यांनी विभाग निहाय झालेल्या बैठकीस अनुसरुन सर्व विभाग प्रमुखांना Software संदर्भात उचित कार्यवाही करण्याबाबत आदेश जारी केले आहेत. सद्याची कोरोना परिस्थिती लक्षात घेता याचे संगणकीकरण करणे जनहिताच्या दृष्टीने आता अनिवार्य झाले आहे.

विश्वविद्यालयात बहुतांश सुविधा एमकेसीएल द्वारे उपलब्ध करुन घेण्यात आल्या आहेत. ज्या सुविधा एमकेसीएल प्रणालीत उपलब्ध नाही, परंतु इतर सुविधा संगणकीकृत करुन त्याचा समन्वय या प्रणालीशी करुन अद्यावत अशी विभाग निहाय प्रणाली निर्माण करण्याचे कार्य सुरु झाले आहे.

यास अनुसरुन केवळ प्रायोगिक तत्वावर Software स्विकृत न करता . प्रत्यक्ष त्याचा वापर करीत असलेली विद्यापीठे आणि अनुभव लक्षात घेवून विभाग प्रमुखांनी विभाग स्तरावर त्यांच्या आवश्यकतेनुसार ही प्रक्रिया वित्त विभागाच्या नियमानुसार पूर्ण करावी असे आदेश जारी केले आहेत. विभागस्तरावर याची कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी आवश्यक ती तांत्रिक समिती गठित व्हावी यासाठीच्या नामनिर्देशनास्तव तसेच उपरोक्त कार्याच्या प्रशासकीय आणि प्रत्यक्ष येणा–या खर्चाच्या मान्यतेस्तव सदर बाब व्यवस्थापन परिषद सभेत सादर करण्यात आली.

निर्णय:– **सभेने संगणकीय Software खरेदी करण्याच्या दृष्टीने तांत्रिक समितीचे गठण करुन प्रक्रिया करुन खरेदी समितीपुढे ठेवावी या प्रक्रियेनुसार खरेदी करण्यास सभेने मान्यता दिली.**

<u>पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग</u>:– १५

बाब क्र. १५.११ **विश्वविद्यालयाचा रजतमहोत्सव साजरा करण्याबाबत. (प्रा. मधुसूदन पेन्ना, मा. अधिष्ठाता द्वारे सादर).**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाची स्थापना १९९७ मध्ये होउन वर्ष २०२२ साली २५ वर्ष पूर्ण होणार आहे. या संदर्भात वर्ष २०२१ ते २०२२ सप्टेंबर पर्यंत वर्षभर रजतमहोत्सव साजरा करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. या महोत्सवांतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याची योजना मा. कुलगुरूंच्या मार्गदर्शनानुसार स्थापित समितीने केलेली असून २०२१ सप्टेंबर पासून या योजनेची अंमलबजावणी करावी लागेल. तरी माहिती व पुढील प्राधिकारिणीकडे अग्रेषित करण्यास्तव ही बाब सादर करण्यात आली होती.

निर्णय– अधिष्ठाता मंडळ सभेत याबाबत चर्चा झाली व खालीलप्रमाणे सूचना करण्यात आल्या.

१. Awards Category अंतर्गत Coordinator & team मध्ये – सौ. कल्याणी देशकर, यांचे नाव अंतर्भूत करणे.

२. Cultural activities Category अंतर्गत Coordinator & team मध्ये – डॉ. जयवंत चौधरी यांचे नाव अंतर्भूत करणे.

३. Seminar साठी – Chief Coordinator सर्व विभाग प्रमुखांना करावे.

४. विशेष व्याख्यानांसाठी विषय तज्ज्ञांची नावे संबंधित समितीकडे द्यावी.

५. उद्घाटन आणि समारोपाच्या कार्यक्रमासाठी मा. कुलाधिपतींना आमंत्रित करावे. यासाठी त्यांचे नाव कार्यक्रम पत्रिकेत अंतर्भूत करावे.

६. या कार्यक्रमात विश्वविद्यालयातील सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सत्कारासाठी आमंत्रित करावे.

Scanned with Oken Scanner

७. अंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यासाठी ICCR यांच्याकडे पाठवावयाचे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून ICCR यांचेकडे निधी उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव पाठवावा.
८. रजतमहोत्सव कार्यक्रमासाठी शासनाकडून निधी मागविण्याकरिता पत्राव्यवहार करावा.
सभेच्या वरील सूचनांनुसार संबंधित समितीने पुढील कार्यवाही करावी

निर्णय : — मा. अधिष्ठाता प्रा.मधुसूदन पेन्ना यांच्या मार्गदर्शनाखाली वरील सूचनेनुसार समितीच्या माध्यमातून पुढील कार्यवाही करण्यास सभेने मान्यता प्रदान केली. याकरिता लागणा—या अंदाजित खर्चास मान्यता प्रदान केली.

(प्रो. श्रीनिवास वरखेडी)
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद

(प्रो. कविता होले)
सचिव
व्यवस्थापन परिषद

Scanned with Oken Scanner